# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| | |
|---|---|
| विषय | मा. महासभा दि. २६/०२/१८ रोजी सकाळी : ११:०० वाजता प्रकरण क्र. ०५ ते ९० |

प्रकरण सुरु झाल्याची तारीख : तहकूब दि. २८/३/१८

प्रकरण बंद केल्याची तारीख : स. ११:००

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | प्र.क्र. : ९८ ते ९९ |

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ / ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/ १६१ /२०१७-१८ दिनांक :- १८/०३/२०१८.

## // परिपत्रक //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ______________________

नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा सोमवार दि. २६/०२/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा वेळे अभावी तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. ९७, पुरक घोषणा क्र. ९८ ते ९९ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम "अनुसूची ड" प्रकरण २ कलम "के" अन्वये सभागृहात प्राप्त झालेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी ही सभा **बुधवार, दिनांक २८/०३/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

VP/PC-1/ D/MY DOC/NS/PARIPATRAK-MAHASABHA-2012-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१
**नगरसचिव विभाग**


जा.क्र मनपा/सचिव/ १६९ /२०१७-१८ दिनांक :- १७ /०३ /२०१८.

## // परिपत्रक //

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती** ______________

नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा सोमवार दि. २६/०२/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा वेळे अभावी तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. ९७, पुरक घोषणा क्र. ९८ ते ९९ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम "अनुसूची ड" प्रकरण २ कलम "के" अन्वये सभागृहात प्राप्त झालेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी ही सभा **बुधवार, दिनांक २८/०३/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या आदेशाने.**

**(वासुदेव शिरवळकर)**
**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापौर**
***मिरा भाईंदर महानगरपालिका***

VP/PC-1/ D/MY DOC/NS/PARIPATRAK-MAHASABHA-2012-17

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २१/०२/२०१८.

## मा. महासभा दि. २६/०२/२०१८
## पुरक घोषणा

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती. ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक २६/०२/२०१८ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ९८ | सन्मा. सदस्य श्री. अनिल सावंत यांचा दिनांक १६/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---<br>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शहराच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण बदल्यात टी.डी.आर. देतेवेळी मोठ्या प्रमाणावर आढळून आलेली अनियमितता, शासकीय नियमांचे झालेले उल्लंघन, न विकसित केलेली आरक्षणे, पालिकेच्या नावावरही न झालेल्या जागा यामध्ये पालिकेचे झालेले आर्थिक नुकसान व शहरवासियांना सोईसुविधांपासून वंचित रहावे लागते आहे, याबाबतचा प्रस्ताव. |
| ९९ | सन्मा. सदस्या श्रीम. गिता जैन यांचा दिनांक २०/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---<br>मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील निवासी वापरातील इमारतींवर तात्पुरत्या स्वरुपाच्या वेदरशेडसाठी ४ महिन्याएवजी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत परवानगी देण्याबाबत. |

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

दिनांक: जानेवारी २०१८.

मा.नगरसचिव
मीरा भाईदर महानगर पालिका
मुख्य कार्यालय भाइंदर-पश्चिम,
ठाणे-४०११०१.

संदर्भ:-महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ ज अन्वये मा.महासभे मध्ये प्रस्ताव घेणेबाबत.

विषय: मीरा भाईदर महानगर पालिकेच्या शहराच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षना बदल्यात टी.डी.आर.देतेवेळी मोठया प्रमाणावर आढळून आलेली अनियमितता, शासकीय नियमांचे झालेले उल्लंघन, न विकसित केलेली आरक्षणे,पालीकेच्या नावावरही न झालेल्या जागा यामध्ये पालिकेचे झालेले आर्थिक नुकसान व शहरवासीयांना सोई सुविधांपासून वंचित राहावे लागले आहे.याबाबत चा प्रस्ताव.

महोदय,

मीरा भाईदर महानगर पालिका विकास नियंत्रणनियमावलीसह शासन अधिसूचना क टी.पी.स.१२९६/८४७/सी.आर १६२/९६ युडी १२ दि.१४.४.९७ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र.टी.पी.स.१२९८/न.प./सी.आर ८९/९८/युडी १२दि.२५.८.२००० अन्वये मंजूर करण्यात आलेली असून टी अनुक्रमे दि.१५/८/९७ व दि.१५.१०.२००० पासून अमलात आली.विकास योजनेत एकून ३८६ आरक्षणे मनपाने विकसित करावयाची होती. त्या पैकी खाजगी जागेवर ३१५,सोल्ठ विभाग २०,शासकीय जागेवर ११ व समावेशक आरक्षणाच्या तरतुदीत १३ आरक्षणांचा समावेश आहे.

१)सदर आरक्षणांचा विकास करणेबाबत मा.महासभेत वेळोवेळी प्रस्ताव देण्यात आले.उदा.दि.१०.१०.२००८ विषय क्र.६० विकास आराखड्यातील आरक्षित आरक्षणे विकसित करणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.
२)मा.महासभा दि.१.०६.२००९ विषय क्र.१६ विकास आराखड्यातील रस्ते भूसंपादित करणे.
३)मा.महासभा दि.१४.०९.२०१० विषय क्र.४५ बगीचा,क्रीडांगण विकसित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.
४)मा.महासभा दि.१६.१२.२०१० विषय कर.७६ विकास योजनेतील महापालिका हस्तांतरित झालेल्या शाळा आरक्षण जागा विकसित करणेबाबत धोरण ठरविणे.
५)दि.१८.१.२०११ महासभा तहकूब २२.१२.२०१० प्रकरण क्र.७६.मा.महासभा दि.२२.१२.१० तहकूब प्रकरण क्र.८२ दि.१२.१.२०११ विषय ९७ महासभा २२.१२.२०१० तहकूब प्र.७१
६)तसेच स्थायी समिती सभा.दि.१७.१.२००८ विषय ३२ विकास आराखड्यातील आरक्षणांच्या महानगर पालिकेच्या ताब्यात आलेल्या जागांना कुंपण भिंत घालणे,माती भराव करणे कामांच्या अंदाज पत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

[illegible]

निविदाही मंजूर करण्यात आली,परंतु सदर आरक्षणांच्या जागा पूर्णतः ताब्यात न आल्याने सदर आरक्षणांच्या निविदा बाबत अंमलबजावणी करणेत येणार नाही असे संबंधितांना पत्राद्वारे कळविनेत आले.(पत्र क्रं.मनपा/स.ब./१४४८/११-१२ दि.२५.५.२०११)अ महापालिकेला दिलेले डिमांड ड्राफ्ट परत घेऊन जावेत असेही कळविण्यात आले.त्यामुळे महानगर पालिकेने दिलेल्या टी.डी.र. मध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे प्रथम दर्शनी सिद्ध होते.या बाबत राष्ट्रीय वृत पत्रांमध्ये उदा.लोकसत्ता,सामना,afternoon मोठया प्रमाणावर छापून आलेले आहे.

यावरून महापालिकेने खाजगी जागा मालकांना टी.डी.आर. तर दिले.परंतु शासकीय नियमाप्रमाणे जागा ताब्यात घेतलेल्या नाहीत,विकसित केलेल्या नाहीत व जागा पालीकाच्या नावावरही झालेल्या नाहीत.यामध्ये पालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहेव शहरवासीयांना सोई सुविधांपासून वंचित रहावे लागले आहे.याबाबत मा.महासभेमध्ये चर्चा होणे आवश्यक आहे.

तरी हा प्रस्ताव मा.महासभे समोर घेनेत यावा हि विनंती.

कळावे,

सूचक

(अनिल दिवाकर सावंत)

अनुमोदक

(जुबेर इनामदार)

**Ex. Mayor, Corporator**

**Mira Bhayandar Municipal Corporation**

प्रकरण क्रं. ११ करिता

दिनांक : २०/०२/२०१८

**दिनांक . २६/०२/२०१८ रोजीच्या मा.महासभेत 'ज' खाली प्रस्ताव घेणे बाबत.**

प्रति,
मा.नगरसचिव सो,
मिरा भाईदर महानगरपालिका.
भाईदर.

विषय : **मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीतील निवासी वापरातील इमारतींवर तात्पुरत्या स्वरूपाच्या वेदरशेडसाठी ४ महीन्याएवजी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत परवानगी देण्याबाबत..**

महोदय,

मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीतील निवासी वापरातील इमारतींवर स्वरूपाच्या वेदरशेडसाठी महिन्याएवजी १ वर्षाच्या कालावधीपर्यंत परवानगी देणे बाबतचे ठराव मा.महासभा दि.८/११/२०१७ प्रकरण २ ठराव क्र .२१ अन्वये पारित केले होते.सदर ठरावाबाबत नागरीक व सोसायटींना जाणीव नसल्याने महापालिका क्षेत्रातील बहुतांश इमारतींवर मोठया प्रमाणात टेरेसवर वेदरशेड उभारले आहे.महापालिका प्रभाग अधिकारी सदर बाबतीत सोसायटयांना व बिल्डींग धारकांना जा.क्र. मनपा/प्र.का.क्र.२/२४७५/ २०१७–१८ व्दारे इमारतींवर टेरेसवर पत्र्याचे शेड उभारून वापर करीत आहेत. सदर पत्राशेड साठी महानगरपालिकेकडुन परवानगी घेतली असल्याची त्यांची कागदपत्र सदर करणे करीता व अन्यथा अनाधिकृत बांधकाम समजून शास्तीसह कर आकारणी व अतिक्रमण कारवाही करण्यात येईल. यामुळे अनेक सोसायटयांना लाखो रूपये खर्च करून उभारण्यात आलेल्या पत्राशेड बाबत भिती निर्माण झाली आहे.

तरी वरील ठरावाप्रमाणे ज्या सोसायटींनी परवानगी न घेता पत्राशेड/वेदरशेड बांधले आहे अशा सर्व सोसायटींच्या मनपा वेदरशेड परवानगी देऊन नियमीत करावे.

आपली विश्वासु ,

[signature]

गीता भरत जैन
(माजी महापौर, नगरसेविका)

**H. O.** : Shop No 3 & 4 - B, Wing, Dev Agan Building, Opp Sheetal Kunj Building, Thakur Prasad Marg, Devchand Nagar, Bhayandar (West) 401 101

**Office** : Shop No. 11, Abhay Apt., Narayan Nagar, Opp. Baldev Bhavan, Bhayandar (W), Tal. Dist. Thane - 401 101.
Tele./ Fax : 28198888 Mob.: 9820502299
Follow on : GeetaBJain • Email : geetajainoffice@gmail.com • www.geetajain.com

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १४/०२/२०१८

## मा. महासभा

मा. महासभा सुचना क्र. ०६

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ____________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सोमवार दि. २६/०२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. महासभा दि. २६/०२/२०१८, सभा सुचना क्र. ०६

विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| – | प्रश्नोत्तरे - |
| – | मागील सभांचे इतिवृत्तांत - |
| 75 | दि. २८/०८/२०१७, १६/१०/२०१७ रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| – | सर्व निवडणूका - निरंक |
| – | सर्व नियुक्त्या - निरंक |
| – | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| – | विनंती अर्ज - निरंक |
| – | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - निरंक |
| 76 | भाईंदर (पूर्व) नवघर आरक्षण क्र. १०९ या जागेत तरण तलाव बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| 77 | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १७८ या जागेतील इमारतीवर पहीला मजला बांधणे कामाबाबत. |
| 78 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी सुविधा क्षेत्राच्या भूखंडावर बुध्द विहार बांधणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| 79 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दर्जेदार शैक्षणिक सुविधा विकसित करणेकरीता शैक्षणिक प्रयोजनाचे ठिकाण योजनेतील आरक्षित भुखंड वितरीत व विकसित करणेकरीता धोरण ठरविणेबाबत. |
| 80 | मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-2014 मध्ये दुरुस्ती करणेबाबत. |
| 81 | आगरी समाज उन्नती संस्थेस जागा देणेबाबत फेरप्रस्ताव सादर करणेबाबत. |
| 82 | भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र. २१७ (दवाखाना व प्रसुतीगृह) चे नामनिधान "रुग्णालय" असे करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास योजनेत व विकास नियंत्रण नियमावलीत आवश्यक ते फेरबदल करणेबाबत. |
| 83 | सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पावसाळापूर्वी कच्चे/पक्के नाले सफाई करणे. |
| 84 | रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. |
| 85 | जाहिरात विभागाच्या उत्पन्नाबाबत धोरण ठरविणे व दराबाबत निर्णय घेणे तसेच मुख्य रस्त्यावरील कमानींवर दिशादर्शक फलक व जाहिरात फलक प्रदर्शित करण्याबाबत दर व धोरण ठरविणे. |
| 86 | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ क नुसार अनधिकृत बांधकामाचे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८ (१) अन्वये शासनाने केलेले नियम प्रसिध्द करणेबाबत. |
| 87 | भाईंदर (पूर्व) नवघर नाका सुशोभिकरण व स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक उभारणे. |
| 88 | मिरा भाईंदर शहरात गोरगरीबांकरीता नाममात्र दरात अन्नछत्र उभारणेबाबत. |
| 89 | भाईंदर (पु.) व (प.), राई, मुर्धे, डोंगरी, तारोडी व उत्तन या परिसरातील महसुली गावांचा बाकी राहिलेला सिटी सर्व्हे करणेबाबत. |
| 90 | भाईंदर पश्चिम व पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे कामाबाबत. |
| 91 | महानगरपालिकेच्या मालमत्ता भाड्याने देणेबाबत धोरण ठरविणे. |
| 92 | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक येथील स्व. प्रमोद महाजनजी इमारतीमधील सभागृह (आरक्षण क्र. २१८) भाडे दर व धोरण ठरविणेबाबत. |
| 93 | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क येथील स्व. मिनाताई बाळासाहेब ठाकरे मार्केट (आरक्षण क्र. २३१) भाडे दर व धोरण ठरविणेबाबत. |
| 94 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) दर वाढीबाबत. |
| 95 | आराधना येथील नाला बांधणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. |
| 96 | प्रभाग क्र.१७ शांतीपार्क गृहसंकुलनातील आर.जी. जागा खाजगी मंडळास विकसीत करणेस देणेबाबत. |
| 97 | रुग्णालय अग्निशमन दाखला नुतनीकरण मर्यादा तीन वर्षे करणेबाबत. |

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- १४ फेब्रुवारी, २०१८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. २६/०२/२०१८ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.

| प्रश्न | | उत्तर |
|---|---|---|
| १. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. ०१/११/२०१७ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत सुरु असलेल्या भुयारी गटार योजना, कॉंक्रीट रस्त्याचे कामे, बी.एस.यु.पी. प्रकल्प, उत्तन घनकचरा प्रकल्प मागील एक वर्षापासून जवळजवळ बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय? | | भुयारी गटार योजना :- होय.<br>बी.एस.यु.पी. प्रकल्प :- हे खरे नाही. |
| अ) सदर प्रकल्प बंद पडण्याची कारणे काय आहेत? | | भुयारी गटार योजना :- भुयारी गटार योजनेच्या मलनि:सारण केंद्रांची विद्युत व यांत्रिकी देखभाल व दुरुस्तीची कामे सुरुच असतात. मलवाहिनी अंथरण्याचे काम पावसाळ्या दरम्यान ब असते. पाऊस गेल्यानंतर साधारणत: ऑक्टोंबर-नोव्हेंबरमध्ये पाईपलाईन अंथरण्याच्या कामास स सद्यस्थितीत रस्ता दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आलेली आहेत.<br>बी.एस.यु.पी. प्रकल्पाची सद्यस्थिती :-<br>१) सदर योजनेअंतर्गत जनतानगर येथील इमारत क्र.०१, (१७९ सदनिका) ची सर्व कामे पूर्ण पात्र लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा देण्यात आलेला आहे.<br>२) जनतानगर येथील इमारत क्र.०२, (२९९ सदनिका) सदर इमारतीचे दुसऱ्या मजल्याचे RC झाले आहे. सदर इमारतीचे तिसऱ्या मजल्याचे RCC काम सुरु आहे.<br>३) जनतानगर येथील इमारत क्र.०३, (२९९ सदनिका) सदर इमारतीचे दुसऱ्या मजल्याचे R सातव्या मजल्यापर्यंत पूर्ण झाले आहे. सदर इमारतीचे आठव्या मजल्याचे RCC काम सुरु इमारतीचे ४ थ्या मजल्याचे Brick Work चे काम सुरु आहे.<br>४) जनतानगर येथील इमारत क्र.०४, (२९९ सदनिका) सदर इमारतीचे पहिल्या मजल्याचे RCC आहे.<br>५) जनतानगर येथील इमारत क्र.०६, (२९४ सदनिका) सदर इमारतीचे RCC चे काम ११ व्या पूर्ण झाले आहे. सदर इमारतीचे १२ व्या मजल्याचे RCC काम सुरु आहे. सदर इमारतीचे ५ Brick Work चे काम सुरु आहे.<br>६) काशि चर्च इमारत क्र.०३, (१२९ सदनिका) सदर इमारतीचे ६० % RCC चे काम ८ व्या पूर्ण झाले आहे. सदर इमारतीचे ६० % Brick Work चे काम ७ व्या मजल्यापर्यंत पूर्ण झाले. इमारतीचे Plinth चे काम सुरु आहे. |

| | |
|---|---|
| | घनकचरा प्रकल्पाची सद्यस्थिती :- <br> मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन व पाली येथे मा. जिल्हाधिकारी यांच्याक घनकचरा प्रकल्पाकरीता 31.46 हेक्टर जागा प्राप्त झाली होती. <br> महानगरपालिका क्षेत्रातून दैनंदिन सुमारे 430 ते 450 मेट्रीक टन घनकचरा निर्माण होत आ सदरचा घनकचरा 79 विविध क्षमतेच्या बंदीस्त वाहनातून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी जमा कर वाहतुक केला जात आहे. दैनंदिन निर्माण होणारा सुका कचरा जमा करणेकरीता 03 टन क्षमतेच्या वाहनातून प्रकल्प ठिकाणी वाहतुक केला जात आहे. <br> मिरा भाईंदर महानरगपालिका क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे करीता तंत्रज्ञ सुचविणे, प्रकल्प उभारणे, प्रकल्प दैनंदिन कामावर देखभाल व नियंत्रण ठेवणे करीता तांत्रिक सल्ला म्हणून आय.आय.टी. मुंबई यांची नेमणूक केलेली आहे. IIT, Mumbai यांनी सुचविलेल्या तां अहवालानुसार DBFOT तत्वावर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी करणे करीता निविदा मागविण्यात आ होती. <br> त्यानुसार मौजे उत्तन-पाली येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प DBFOT तत्वावर 07 वर्षे काला करीता प्रकल्प उभारणेसाठी मे. सौराष्ट्र इन्वायरो प्रोजेक्ट प्रा. लि. यांची निविदा मंजुर केली आहे. स कामी दि. 06 मार्च, 2017 रोजी करारनामा करुन देऊन कार्यादेश देण्यात आला आहे. घनकचरा प्रक्रि प्रकल्प उभारणीचे Project Completion Schedule तयार करण्यात आले आहे. प्रकल्प संबंधित Drawing यांना आय.आय.टी. मुंबई यांनी मंजुरी दिली आहे. प्रकल्पासंबंधित machines, mechan equipments यांना आय.आय.टी. मुंबई यांनी मंजुरी दिली आहे. त्यानुसार सुका कचऱ्यावर (Recycla Waste) वर प्रक्रिया करणे प्रकल्प माहे 25 नोव्हेंबर, 2017 पर्यंत सुरूवात करण्यात येणार आहे. स घनकचरा प्रक्रिया प्रकल्प माहे 11 मार्च, 2018 पर्यंत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात येणार आहे. |
| ब) सदर प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रशासनामार्फत कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत अथवा येणार आहेत? | भुयारी गटार योजना :- भुयारी गटार योजनेचे काम प्रगतीपथावर असून योजनेची ९६% प्रगती झाली. मिरा भाईंदर शहरातंर्गत ९० कि.मी. पाईपजाईन टाकरण्याचे काम पूर्ण झाले असून ६ मलनि:सारण देखील कार्यान्वीत करण्यात आलेली आहेत. <br> योजनेची उर्वरित कामे लवकरच पूर्ण करुन योजना पूर्णपणे कार्यान्वीत करण्यात येईल. |
| २. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. ०१/११/२०१७ रोजी विचारलेला प्रश्न. | |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मागील ५ वर्षापासून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झालेली असून प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत अनधिकृत बांधकामांच्या माहितीबाबत नियमानुसार ठेवण्यात येणारी नोंदवही ठेवण्यात आली | प्रत्येक प्रभागनिहाय नोंदवही ठेवण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| अ) सदर नोंदवहीचा नमुना महाराष्ट्र लेखा संहितानुसार अथवा कोणत्या कायद्यानुसार ठेवण्यात येतो? | | --- |
| ब) मागील ५ वर्षात आढळून आलेल्या प्रभागनिहाय अनधिकृत बांधकामांची यादी, सदर बांधकामांना देण्यात आलेल्या नोटीसीची माहिती, बांधकामांवर केलेली कारवाई, न्यायालयीन स्थगीती, लेखी कथन याबाबतची माहिती मा. महासभेसमोर उपलब्ध करुन देण्यात यावी. | | मागील ५ वर्षातील माहिती.<br>प्रभाग क्र. १<br>निदर्शनास आलेली बांधकामे - २४०<br>निष्कासीत केलेली बांधकामे - २३१<br>प्रभाग क्र. २<br>निदर्शनास आलेली बांधकामे - ४८<br>निष्कासीत केलेली बांधकामे - ३३<br>प्रभाग क्र. ३<br>निदर्शनास आलेली बांधकामे - ५२<br>निष्कासीत केलेली बांधकामे - ३१<br>प्रभाग क्र. ४<br>निदर्शनास आलेली बांधकामे - ११५<br>निष्कासीत केलेली बांधकामे - ५६<br>प्रभाग क्र. ५<br>निदर्शनास आलेली बांधकामे - १५८<br>निष्कासीत केलेली बांधकामे - ११४<br>प्रभाग क्र. ६<br>निदर्शनास आलेली बांधकामे -<br>निष्कासीत केलेली बांधकामे - २००० |
| क) पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर अनधिकृत बांधकामाबाबत कोणत्या कायद्यानुसार व कोणती कारवाई होऊ शकते? याबाबता तपशिल आजपर्यंत नदनिर्देशित अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा तपशिल देण्यात यावा. | | ---- |
| ३. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. १०/११/२०१७ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) सन २०११ पासून मा. न्यायालयात दावा दाखल केलेल्या प्रकरणांवर सद्यस्थितीत काय कार्यवाही प्रस्तावित आहेत? | | सन 2011 पासुन आजातागायत मनपा क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यासंदर्भात महानगरपालिकेविरुध्द दाखल न्यायप्रविष्ठ प्रकरणांपैकी निकाली निघालेल्या प्रकरणांमधील आदेश वेळोवेळी पुढील कार्यवाहीस्तव संबंधित विभागास कळविण्यात आलेले आहेत. तसेच प्रलंबित प्रकरणांमध्ये माहिती व कागदपत्रे मिळणेकरीता संबंधित विभागांस पत्र देण्यात आलेले असुन माहिती व कागदपत्रे प्राप्त झालेल्या |

| | |
|---|---|
| | बहुतांशी न्यायप्रविष्ठ प्रकरणांमध्ये महानगरपालिकेच्यावतीने लेखी कथन दाखल |
| अ) ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयाची स्थगिती समाप्त झाली आहे अशा किती व कोणत्या प्रकरणांवर कारवाई करण्याबाबत प्रभाग अधिकारी व विभागप्रमुख यांना दिलेल्या पत्रांची छायांकित प्रत देण्यात यावी व आकडेवारी नमुद करावी. | सन 2011 पासुन आजतागायत मनपा क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व न्यायप्रविष्ठ प्रकरणांची खालील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे आकडेवारी देण्या |

| अ.क्र. | वर्ष | मा. न्यायालय | निकाली |
|---|---|---|---|
| 1 | सन 2011 | मा. न्यायालय, ठाणे | 65 |
| | | मा.उच्च न्यायालय, मुंबई | 12 |
| 2 | सन 2012 | मा. न्यायालय, ठाणे | 82 |
| | | मा.उच्च न्यायालय, मुंबई | 21 |
| 3 | सन 2013 | मा. न्यायालय, ठाणे | 26 |
| | | मा.उच्च न्यायालय, मुंबई | 31 |
| 4 | सन 2014 | मा. न्यायालय, ठाणे | 21 |
| | | मा.उच्च न्यायालय, मुंबई | 24 |
| 5 | सन 2015 | मा. न्यायालय, ठाणे | 11 |
| | | मा.उच्च न्यायालय, मुंबई | 9 |
| 6 | सन 2016 | मा. न्यायालय, ठाणे | 49 |
| | | मा.उच्च न्यायालय, मुंबई | 26 |
| 7 | सन 2017 | मा. न्यायालय, ठाणे | 118 |
| | | मा.उच्च न्यायालय, मुंबई | 21 |

वरीलप्रमाणे निकाली निघालेल्या प्रकरणांमधील आदेश वेळोवेळी पुढील कळविण्यात आलेले असुन आदेश कळविणेबाबतच्या इकडील विभागाच्या करण्याचे काम सुरु असुन सदरच्या प्रती संकलित झाल्या असता त्वरीत येतील.

| | |
|---|---|
| ब) सन २०११ पासून आतापर्यंत मनपा विरोधात निकाल लागलेल्या प्रकरणांमधील किती व कोणकोणत्या प्रकरणांमध्ये अपील करण्यात आले व कोणत्या प्रकरणात अपील केले नाही याची माहिती देण्यात यावी. | सन 2011 ते आजतागायत मनपा क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व अ महानगरपालिकेविरुध्द तसेच महानगरपालिकेच्यावतीने मा. जिल्हा न्याय आलेल्या अपीलांची वर्षनिहाय सविस्तर माहितीची सद्यस्थितीसह नोंद अस येत आहे. |
| क) सन २०११ पासून मा. न्यायालयात घेतलेली स्थगीती किती प्रकरणांवर त्वरीत | सन 2011 ते आजतागायत मनपा क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व |

| | | |
|---|---|---|
| उठविण्यात आली? | | दाखल दावे/याचिका यांची जैसे-थे आदेश असल्यास अथवा जैसे-थे आदेश नसल्यास तशी नोंद असलेली सविस्तर नोंद असलेली यादी सोबत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |
| ड) पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर कामचूकार, कामामध्ये दिरंगाई व हलगर्जीपणा किंवा विरोधकांना मदत केल्यास कोणत्या कायद्यानुसार कोणती कारवाई होऊ शकते? | | शासकिय अधिकारी/कर्मचारी यांनी कर्तव्यात कसुर केल्यास, कामात दिरंगाई व हलगर्जीपणा केल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम 1979 तसेच महाराष्ट्र महानगरपालिका महानगरपलिका अधिनियम चे कलम 397 अ (2) अन्वये कार्यवाही होऊ शकते. |
| ४. सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. १०/११/२०१७ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मिरा भाईंदर मनपा क्षेत्राचे सिटी सर्व्हे करण्याचे काम सुरु करण्यात आले होते, हे खरे आहे काय? असल्यास सदर काम पूर्ण झाले आहे का? व नसल्यास सदर काम अर्धवट स्थितीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय? | | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचे नगरभूमापनाचे काम सन 2008 पासून सुरु करण्यांत आलेले आहे. मोजणीचे काम पूर्ण झालेले असून शासनाच्या भुमि अभिलेख विभागाकडून चौकशीचे काम सुरु आहे. |
| अ) शासनाच्या जमावबंदी आयुक्तांमार्फत मनपाने केलेले सिटी सर्व्हेचे काम तपासून अंतिम करण्यासाठी सक्षम अधिकारी नेमण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय? | | सद्यस्थितीत मौजे काशी या गावासाठी शासनाकडून चौकशी अधिकारी नेमण्यांत आलेले आहेत. |
| ब) सदर विलंबाची कारणे व शासनामार्फत करावयाच्या उपाययोजना व सदर काम कधीपर्यंत पूर्ण होणार? | | शासनाशी संबंधित आहे. |
| ५. श्री. जुबेर इनामदार मा. सदस्या यांनी दि. ३०/११/२०१७ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मा. महासभा दि. 30/07/2010 प्रकरण क्र. 26 ठराव क्र. 32 1966 चे कलम 37 अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्याचा विषय मंजुरीसाठी शासन दरबारी पाठविला होता त्या वर शासनाने काय कारवाई केली आहे ? | | मा. महासभा दि. 30/07/2010 प्रकरण क्र. 26 ठराव क्र. 32 1966 चे कलम 37 अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्याचा विषय मंजुरीसाठी शासनाने पाठविलेला असुन शासन स्तरावर प्रलंबित आहे. त्यांनतर विकास हक्क प्रमाणपत्राबाबत शासनाने दि. 29/01/2016 रोजी अधिसुचना पारित केलेली असुन त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. |
| अ) तत्कालीन आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेबांनी दि. 22/02/2011 रोजी जावक क्र.मनपा / सा.बा./8830/2010-11 अन्वये श्री. जयेश शहा (रवि डेव्हलपर्स) यांना सिमेंट कॉक्रीटचे रस्ते विकसीत करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीच्या कोणत्या नियमांना अधिन राहुन कार्यादेश दिले ? | | मा. महासभेच्या ठरावानुसार विकासकास परवानगी देण्यात आलेली आहे. |
| ब) मिभामनपा सार्वजनिक बांधकाम विभागाने वरील विषया ह्यांचे दिनांक 24/09/2014 रोजी विधी विभागाला अभिप्रायसाठी पत्र सादर केले. त्याला अनुसरुन विधी विभागाच्या अभिप्राय वर मनपाने काय निर्णय घेतला ? | | शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. |
| क) मे. रवि डेव्हलपर्स (श्री. जयेश टी. शहा) व इतर सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. 158/2, 159, 156/2, 154/2, 152/2, 81/1,2,3/पै, 5,6, 85/1, 27/1, 10अ, 28/5, | | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मंजुर रेखांकनातील दर्शविलेले विकास योजना रस्ते विकसीत करण्यासाठी मे. रवि डेव्हलपर्स यांना कार्यादेश दिलेले आहे. तथापी रेखांकनातील दर्शविलेले भुखंड / विकास |

| | |
|---|---|
| 29/3, 27/2, 72/2, 73/1,2,3,4 74/1,2, 75/1, 79/1,2,3 4,88/1/1, 89/1,3, 225/पार्ट, 435, 436, 437/1 ते 3,5 ते 11, 438/1 ते 3,5 439/1पै, 6,8, 40/1,2,3 ते 8,11,12,13, 444/5, 443/1पै, 443/2पै, 418/3,4 444/1,3, 418/2, 409/3, 396/7 मौजे मिरा/ घोडबंदर/ नवघर हे जमीन मालक आहेत, पट्टाधारक किंवा अधिका पत्रधारक आहे. | योजना रस्त्याचे 7/12 धारक यांनी करारनामे करुन मे. रवि डेव्हलपर्स यांना विकसीत देण्यात आलेले आहे. |
| ड) मे. रवि डेव्हलपर्स यांनी मनपाचे ठरवुन दिलेल्या सिमेंट कॉक्रीट रस्ते विकसीत करण्यासाठी दिलेल्या कार्यादेशातील तपशीला नुसार नसल्याचे व केलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याने WAPCOS लि. यांने दि. 04/01/2013 रोजीच्या पत्रान्वये मनपाला सुचित केले. तसेच मा. उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र. 5509 /2012 मे. रवि डेव्हलपर्स केलेले काम हे निकृष्ट दर्जाचे असल्याने प्रतिज्ञापत्राद्वारे मनपा शहर अभियंता यांनीही सादर केले आहे. | मे. वॉप्कोस लि. यांनी दिलेला अहवाल बरोबर आहे. |
| इ) मे. रवि डेव्हलपर्स ह्यांनी मनपाचे त्रयस्थ पक्ष WAPCOS लि. ह्यांनी सादर केलेल्या अहवालाला चुकीचे ठरविणारे अन्य त्रयस्थ पक्ष यांचा तांत्रिक अहवाल सादर करुन सिमेंट कॉक्रीटचे रस्ते विकसीत करण्याचे मोबदला म्हणुन विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची मागणी केली. असे असता, चुकीचा अहवाल सादर करणाऱ्या त्रयस्थ पक्ष WAPCOS लि. ह्यांना मनपा प्रशासनाने काळया यादीत का टाकले नाही | मे. रवि डेव्हलपर्स ह्यांनी महानगरपालिकेमार्फत दिलेल्या क्रॉस् सेक्शन नुसार काम न के त्यांच्या अहवालामध्ये सदर बाब नमुद केली होती. मे. रवि डेव्हलपर्स यांनी केलेल्या का आय.आय.टी. मुंबई यांनी तपासणी केली असुन त्याचा अहवाल दिलेला असल्याने मे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. |
| ई) मिरा भाईंदर महानगरपालिकेने मे. रवि डेव्हलपर्स पार्टनर (श्री. जयेश टी. शहा) यांना प्रदान केलेले विकास हक्क प्रमाणपत्र क्र. 517/2015 व 530/2016 प्राप्त केल्यानंतर त्याने त्यांची किती अनधिकृत बांधकाम अधिकृत करुन घेतली आहेत? | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेतील मौजे नवघ परिसरातील मंजूर रेखांकन दर्शविलेले विकास योजना रस्ते सिमेंट कॉंक्रिटीकर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने मे. रवी डेव्हलपमेंट यांना कार्या त्याप्रमाणे मे. रवी डेव्हलपमेंट यांनी विकसीत केलेल्या कॉंक्रीट रस्त्यापैकी महानगरपालिकेने विकास हक्क प्रमाणपत्र क्र. 517 व 530 अन्वये विकास विकासकास दिलेले असून उर्वरीत क्षेत्रासाठी विकास हक्क प्रमाणपत्र देणे बाकी नमुद केल्याप्रमाणे मे. रवी डेव्हलपमेंट यांनी विकास हक्क प्रमाणपत्र क्र. 51 क्षेत्राचा वापर करुन अनधिकृत बांधकाम नियमाकूल केलेले नाही.<br>तथापि विकासकाने मौजे नवघर / घोडबंदर येथील मंजूरीपेक्षा नियमानुसार करण्यासाठी स.क्र. मौजे घोडबंदर, 1) *स.क्र.*81/1,2,3*पै.*,5,6; 2) *स.क्र.*27/1, 10*अ,* 2, *व स.क्र.*28/5, 29/3, 4) *स.क्र.*83/1,2; 85/1/1*अ,* 5) *स.क्र.*86/ *स.क्र.*87/1*अपै.*, 1*ब,*1*क,*1*ड,*2 *व स.क्र.*88/1/1, 1/3, *स.क्र.*89/1,3, *स.क्र.*105/1,2, *स.* |

| | | |
|---|---|---|
| | | 72/2, 73/1,2,3,4, 74/1,2, 75/1, 79/1,3,4, 7) स.क्र.82 यासह नव्याने समाविष्ट स.क्र.26/1,2; 27/3,5,6,7,10ब, 28/1,2पै.,3पै.,29/1; 30/7पै.8पै.,; 41/1,4अ,; 43/2,4,5,6; 55/2; 56/8; 63/1,2,3,4,6ब,7,8,9; 64/1,2,3,4; 67/1,2; 68/1,2,3; 70/1,2; 71/1,2; 72/1,2; 75/2,; 81/4ब, 86/2; 224/1क, 225/1क,; 226/1,2; 228/1ब,3; 232/1अ,1ब,1क,2अ,2ब, 234/1 व मौजे नवघर मधील स.क्र./हि.क्र. 1) स.क्र.92पै.,93, 94, 95पै., (जुना स.क्र.430 पै., 431, 432, 433पै.,), 2) स.क्र.128 (जुना 444/5), 3) स.क्र.127 (जुना 443)/1पै., 1पै., 4) स.क्र.106 (जुना 419), 116(420)/1,2,3; 117(जुना 421)/1,2,3अ,3ब,4,5,6, 103(जुना 422)/1,3पै. ,4,5,6,7,8, 9,10,11, 105(जुना 423)/2,3,4,5पै., 5पै., 5पै., 5) स.क्र. 96(जुना 429)/2, 6) 96(जुना 429)/5, 7) 435पै., 436/2, 437/1 ते 11, स.क्र.438/1 ते 3, 439/1 ते 6,8; 440/1,3 ते 8,11,12,13; 8) 127(जुना 443)/2पै., 128(जुना 444)/1,3, 126(जुना 418)/2,3,4, 124(जुना 417)/7, 9) 130(जुना 446)/1पै., 10) स.क्र. 447 (जुना 142)/4, 11) स.क्र. 129(जुना 445), 130(जुना 446)/3, तसेच नव्याने समाविष्ट स.क्र. 105 (जुना 423)/1, 98(जुना 428)/3, 96(जुना 429)/1,3; 95(जुना 430)/1, 107(जुना 436)/3, 115(जुना 442)/1 ते 5ब, 130(जुना 446)/2, 142(जुना 444)/4, 447/3,5 प्रस्ताव सादर केलेला होता. सदर प्रस्तावाची छाननी केली असता प्राप्त प्रस्तावावर काही आवश्यक कागदपत्रांच्या पूर्तते अभावी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/1715/2017-18, दि.29/07/2017 अन्वये नामंजूर केलेला आहे. |

(बी. जी. पवार)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला.

प्रशासनास लेखी पत्राद्वारे आदेश दिले आहेत.

महापालिका कार्यक्षेत्रात सर्वच रस्त्यांवर नागरिक आपली जुनी वाहने उभी करुन ठेवतात, तर काही ठिकाणी बेवारस वाहने देखील असल्याने सातत्याने वाहतुक कोंडी होते. तसेच सदर वाहनासंदर्भात महापालिका, वाहतुक नियंत्रण विभाग व पोलीस विभागाच्या संयुक्त विद्यमाने कार्यवाही करण्याबाबतही महापौर यांनी प्रशासनास कळविले आहे. जे वाहनधारक नोटीस देवूनही सहकार्य करणार नसतील तर अशी वाहने सातत्याने ... अशा प्रकारे जर कार्यवाही केल्यास महापालिका कार्यक्षेत्रातील रस्ते अतिक्रमण मुक्त व वाहतुकीस मोकळे होतील व ठाणेकर नागरिकांना दिलासा मिळेल अशी आशा महापौर यांनी व्यक्त केली आहे.

---

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,

दिनांक :- १४/०२/२०१८

## मा. महासभा

*मा. महासभा सुचना क्र. ०६*

प्रति,

सन्मा. श्री./श्रीमती ______________

नगरसेवक / नगरसेविका,

मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सोमवार दि. २६/०२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

सही/-

(वासुदेव शिरवळकर)

प्र. नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. महासभा दि. २६/०२/२०१८, सभा सुचना क्र. ०६

...यांना सांगितले.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांवरचे जुने पारंपरिक दिवे बदलून नवीन एलईडी दिवे लावण्यासाठी एनर्जी एफिशिएन्सी सर्व्हिसेस लिमिटेड (ईईएसएल) व नगरविकास विभाग यांच्यात सामंजस्य करार देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव मनिषा म्हैसकर, ईईएसएलचे व्यवस्थापकीय संचालक सौरभकुमार उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, यावेळी ईईएसएल ला दिली. या सामजस्य करारानुसार ईईएसएलच्या स्ट्रीट लाइटिंग नॅशनल प्रोग्रॅम अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व प्रमुख शहरातील रस्त्यांवर सुमारे २० लाख एलईडी दिवे लावले जातील. यामधुन ५०० मेगावॅट वीज बचत होणार असून वीज बिलात किमान ५० टक्कयांनी घट होणार आहे.

नगरविकास विभागाच्या अखत्यारीतील सुमारे ३९४ शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना टप्प्या-टप्प्याने या योजनेचा लाभ मिळेल. या प्रकल्प अंतर्गत सध्याचे सोडियम व्हेपर, मर्क्युरी व्हेपर दिवे बदलून तिथे एलईडी दिवे



लावले जातील. तसेच या दिव्यांची पुढील सात वर्षे देखभाल केली जाईल. या योजनेत मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर,कोल्हापूर, सातारा, सांगली आणि नांदेड यासारखी प्रमुख शहरे समाविष्ट असतील.

या करारानुसार, रस्त्यावरील एलईडी दिव्यांचा पुरवठा करणे, बसविणे, सुरू करणे तसेच दिवे बसवल्यानंतरची देखभाल दुरुस्ती आणि वॉरंटी कालावधीतील अदलाबदल यासह सेवा आणि देखभाल पुरवणे अशी संपूर्ण जबाबदारी ईईएसएलने घेतली आहे.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रात ईईएसएलने यशस्वीरित्या केलेल्या कामाचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी संघटनेतर्फे

---

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

महापालिका सचिव कार्यालय,

दिनांक :- १४/०२/२०१८

## मा. विशेष महासभा

मा. महासभा सुचना क्र. ०५

प्रति,

सन्मा. श्री./श्रीमती ______________

नगरसेवक / नगरसेविका,

मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा मंगळवार दि. २०/०२/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०५ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी [illegible]

मा. महासभा दि.२६/०२/2018

**बांधकाम विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( ५६ )** :- भाईंदर (पुर्व) नवघर आरक्षण क्र.109 या जागेत तरण तलाव बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**प्रस्ताव**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर (पुर्व) नवघर गुरुद्वाराजवळ आरक्षण क्र.109 मैदानासाठी राखीव आहे. सदर जागेत तरण तलाव बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीची मागणी असुन सदर ठिकाणी तरण तलाव बांधल्यास सदर भागातील मुलांना तसेच रहीवाशांना चांगली सोय उपलब्ध होऊ शकेल. सदर कामासाठी रु.1,99,33,395/- एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सन 2017-18 या वर्षाच्या अर्थसंकल्पात "तरण तलाव बांधणे व सुशोभिकरण करणे" या लेखाशिर्षात रु.2.00 कोटी रकमेची तरतुद करण्यात आलेली असुन सदर लेखाशिर्षातुन यापुर्वी राष्ट्रीय महामार्ग क्र.8 वर लोढा॰ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत तरण तलाव बांधणे कामाच्या खर्चास मा.महासभेने प्रशासकिय व आर्थिक मान्यता दिलेली आहे. तथापी सदर जागेबाबत वाद निर्माण झाल्याने सदर कामाबाबत पुढील प्रक्रीया करण्यात आलेली नाही, भविष्यात सदर काम विकास हक्क प्रमाणपत्राच्या तरतुदीनुसार विकासकाकडुन देखील बांधुन घेणे शक्य होणार आहे. त्यामुळे "तरण तलाव बांधणे व सुशोभिकरण करणे" या लेखाशिर्षातुन भाईंदर (पुर्व) नवघर आरक्षण क्र.109 या जागेत तरण तलाव बांधणे कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणेस शिफारिस आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2017-18/DK/MG-3

गोषवारा प्राप्त दि. ६/१२/२०१७ वेळ ५.०५
~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ७६

लिपीक
नगरसचिव विभाग

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

मा. महासभा दि.२६/०२/2018

// गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ७७ ) :-** मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.178 या जागेतील इमारतीवर पहीला मजला बांधणे कामाबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) येथील मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.178 (मैदान) या ठिकाणी शासनामार्फत विशेष निधी अंतर्गत इमारत बांधण्यासाठी रु.2.00 कोटीच्या कामास प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार विहीत प्रक्रीया करुन इमारतीचे काम सुरु आहे. सदर इमारतीवर पहील्या मजल्याचे तसेच तळ मजल्यावरील उर्वरीत कामे करावयाची असुन सदर कामासाठी रु.1,71,97,049/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद केल्यानंतर नविन निविदा प्रक्रीया करुन सदर काम करणे आवश्यक आहे. मा. महापौर यांच्या पत्राच्या अनुशंगाने सदर कामाबाबतची वस्तुस्थिती सादर करण्यात येत आहे.

(डॉ. नरेश गीते)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2017-18/DK/MG-9

गोपवारा प्राप्त दि ८/०९/२०१८ वेळ ५:३० वा.
ना. ~~सर्वसाधारण समिती~~ / महासभा गोपवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ६४
८/०९/२०१८
नगर सचिव विभाग.

मा. महासभा दि. - २६/०२/२०१८

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक ( १०८ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी सुविधा क्षेत्राच्या भूखंडावर बुध्द विहार बांधणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कम्युनिटी हॉल या आरक्षणावर अथवा नागरी सुविधा क्षेत्राच्या भूखंडावर बुध्द विहार बांधणेसाठी गोषवारा सादर करण्याबाबत मा. महापौर यांनी कळविलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत कम्युनिटी हॉलची आरक्षणे असून सदर आरक्षणाच्या जागा ताब्यात घेऊन अथवा नागरी सुविधा क्षेत्राच्या भूखंडावर देखिल बुध्द विहार बांधणे शक्य आहे. सदर बुध्द विहार बांधण्यासाठी वास्तुविशारदाकडून नकाशे तयार करून सदर नकाशे मंजूर करून सदर मंजूर नकाशानूसार अंदाजपत्रक तयार करून सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर कामासाठी तरतूद उपलब्ध करावी लागेल. बुध्द विहार बांधणे कामाच्या अनुशंगाने कराव्या लागणाऱ्या कार्यवाहीबाबतची माहिती व वस्तूस्थिती मा. महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

(डॉ. नरेश गीते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2017-18/MG-11

नोट रजिस्टर अ. क्र. ८६

दिनांक ०८/०७/२०१८

नगरविकास विभाग.

मा. महासभा दि.२८/०२/२०१८

बांधकाम विभाग

//गोषवारा//

प्रकरण क्र. ( ७९ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दर्जेदार शैक्षणिक सुविधा विकसित करणेकरीता शैक्षणिक प्रयोजनाचे विकास योजनेतील आरक्षित भूखंड वितरीत व विकसित करणेसाठी धोरण ठरविणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील शाळांचे भुखंड विकसित करण्यासाठी नविन शैक्षणिक धोरण ठरविणे करीता मा. आयुक्त यांच्या दि.१९/०९/२०१६ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | |
|---|---|
| उप-आयुक्त (मुख्यालय) | अध्यक्ष |
| शहर अभियंता | सदस्य |
| नगररचनाकार | सदस्य |
| प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ | सदस्य |
| कार्यकारी अभियंता (बांधकाम/ मिळकत) | सदस्य सचिव |

सदर समितीने ठाणे महानगरपालिकेने ठरविलेल्या शैक्षणिक धोरणाचा तसेच प्रचलित शासन निर्णयाचा अभ्यास करुन व वेळोवेळी समितीची बैठक घेऊन शैक्षणिक सुविधा वितरण व विकसनाचे प्रारुप धोरण तयार केले आहे.

**प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना २८ फेब्रुवारी २००२ रोजी झालेली असून शहराची सन २०११ च्या जनगणनेनूसार लोकसंख्या ८.१४ लक्ष एवढी आहे. सद्यस्थितीतील लोकसंख्या सुमारे १२ लक्ष एवढी असून लोकसंख्या वाढीच्या दरानूसार सन २०३६ या वर्षात सुमारे २८.५० लक्ष एवढी लोकसंख्या होण्याचा अंदाज नमूद करण्यात आला आहे. सद्यस्थितीमध्ये मिरा भाईंदर शहरामध्ये उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधा प्रामुख्याने महानगरपालिकेमार्फत व खाजगी संस्थामार्फत विकसित करण्यात आल्या आहेत. अस्तित्वातील शैक्षणिक सुविधा प्रामुख्याने प्राथमिक, माध्यामिक व उच्च माध्यामिक शिक्षणासाठी आहेत. शहराची सध्याची लोकसंख्या व भविष्यातील वाढणाऱ्या लोकसंख्येचा विचार करता प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यामिक, उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षणाच्या दर्जेदार व पुरेशा शैक्षणिक सुविधा विकसित होणे शहराचे सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने जरूरीचे आहे. त्यामुळे शिक्षणाच्या सुविधा करणेसाठी सर्वकष असे शैक्षणिक प्रयोजनाचे आरक्षित भूखंड/ बांधिव सुविधा वितरीत व विकसनाचे धोरण असणे जरूरीचे झाले आहे.

... दिनांक १५.०१/०२/२०११ ठराव क्र. ७९ अन्वये शैक्षणिक धोरण ठरविण्यात आले होते. सदर धोरण खालीलप्रमाणे आहे.

१) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळा आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी ३०% क्षेत्र ताब्यात आलेली आरक्षणे ३० वर्ष मुदतीसाठी शैक्षणिक संस्थाकडून प्रस्ताव मागवुन विकासासाठी देण्यात यावीत.

२) विकसित करावयाच्या एकूण आरक्षणापैकी ३०% आरक्षणे महानगरपालिकेच्या शाळांसाठी राखून ठेवावीत.

३) शैक्षणिक संस्था हया १० वर्षापुर्वी नोंदणीकृत असाव्यात.

४) शाळा आरक्षणे विकसित करताना संबंधित संस्थेने ३०% जागा बी.पी.एल. खालील विद्यार्थ्यासाठी राखून ठेवण्यात व त्यांचे शिक्षण मोफत असावे. बी.पी.एल. च्या जागा भरल्या नाहीत तर कमी उत्पन्न गटाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. सदर दोन्ही प्रकारे जागा न भरल्यास उच्च उत्पन्न गटाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात याव्यात.

५) इतर सर्व अटीशर्ती आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी ठरविल्यास व कार्यवाही करण्यात यावी.

वरील धोरणानुसार निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापी सदर प्रक्रिया रद्द करण्यात आली.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेत शाळेसाठी आरक्षित असलेले व महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आरक्षणे मागील तीन वर्षापासून पडून असून शहरातील शैक्षणिक संस्थाकडून भुखंडाची मागणी होत असते.

१) नविन शैक्षणिक सुविधा विकसित करणेकरीतांच्या धोरणाची आवश्यकता.

मिरा भाईदर महानगरपालिका परिक्षेत्रातील शैक्षणिक प्रयोजनार्थ आरक्षित भूखंड/बांधीव सुविधा वितरण व विकसनाकरिता सद्यस्थितीत असलेल्या धोरणातील नमुद तरतूदी व्यवहार्य, प्रभावी व परिपूर्ण नसल्याने शहरामध्ये शैक्षणिक सुविधा अपेक्षित प्रमाणात विकसित होऊ शकल्या नाहीत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शैक्षणिक संस्थाना शहरामध्ये शैक्षणिक सुविधा विकसित करणेसाठी आकर्षित करणे जरूरीचे आहे. दर्जेदार शैक्षणिक सुविधा विकसित होणेकरिता पुढील मुलभूत बाबी अंतर्भूत असलेले सर्वकश व प्रभावी धोरण असणे जरुरीचे आहे.

१.१ निकोप व वाजवी स्पर्धात्मक भूखंड/सुविधा वितरणाकरीता, व्यापक प्रसिध्दीव्दारे दर्जेदार व अनुभवी शैक्षणिक संस्थाना संधी देणे.

१.२ शैक्षणिक संस्थाना सुविधा विकसित करणे व शाळा/महाविद्यालय चालविणे आर्थिक दृष्ट्या सुसह्य व्हावे म्हणून अधिनियमातील तरतुदीनुसार बाजारमुल्याप्रमाणे भाडे रक्कम न आकारता शासन मान्यतेने व्यवहार्य व वाजवी भाडेरक्कम आकारणे.

प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, उच्चशिक्षण व व्यावसायिक असे वर्गीकरण करुन संस्थाच्या शैक्षणिक फी आकाराच्या प्रमाणात भाडे कराराची रक्कम ठरविणे.

१.४ शैक्षणिक सुविधा विकसनाकरिता प्रोत्साहन देण्याबरोबरच महानगरपालिकेस वाजवी प्रमाणात महसूल प्राप्त होऊ शकेल अशी व्यवहार्थ वितरण पध्दती अवलंबिणे.

२) शैक्षणिक प्रयोजनाचे भुखंड/बांधीव सुविधा वितरण व विकसनासाठीचे प्रस्तावित धोरण

२.१ वितरणाची कार्यपध्द्ती

२.१.१ नगररचना विभागाकडून शैक्षणिक प्रयोजनाच्या आधारित भुखंडाची व बांधीव सुविधांची यादी उपलब्ध करुन देण्यात येईल.

२.१.२ प्राथमिक शिक्षणासाठी उपलब्ध असलेले व शिक्षण विभाग यांना आवश्यक नसलेले भुखंड/सुविधा तसेच माध्यमिक शाळा, महाविद्यालय व व्यावसायिक शिक्षणांकरिता राखीव भूखंड/सुविधा यांची यादी जाहिरातीव्दारे मान्यताप्राप्त किमान तीन वृत्तपत्रात प्रसिध्द केली जाईल. यापैकी एक वृत्तपत्र स्थानिक व दोन राज्यस्तरिय असेल. इतर भाषिक शाळांकरिता राखीव भूखंड/सुविधा करिताची जाहिरात संबंधीत भाषेतील एका वृत्तपत्रात प्रसिध्द केली जाईल. जाहिरातीव्दारे मान्यताप्राप्त खासगी नोंदणीकृत शैक्षणिक संस्थाकडून अर्ज मागविले जातील. असे अर्ज आयुक्तांनी मंजूर केलेल्या विहित नमुन्यात असतील. सदर कामासाठी संगणक प्रणाली व ऑनलाईन NIC वर प्रसिध्दी देण्यात येईल.

२.१.३ खालील परिच्छेद क्र. २.१.२ मध्ये नमुद केलेले पात्रतेचे निकषांची पूर्तता करणाऱ्या शैक्षणिक संस्था असे अर्ज करण्यास पात्र राहतील.

२.१.४ आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली उपायुक्त (मु.), शहर अभियंता, नगररचनाकार, प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ असे सभासद असलेली समिती प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करतील. या समितीचे सचिव म्हणून कार्यकारी अभियंता (बांधकाम/ मिळकत) हे काम पाहतील.

२.१.५ समितीचे सचिव या नात्याने कार्यकारी अभियंता (बांधकाम/ मिळकत) हे समितीचे निर्णय नमुद करतील, आयुक्तांची मंजूरी घेतील व महानगरपालिकेच्या मंजूरीसाठी सादर करण्याचा योग्य प्रस्ताव तयार करतील. सदर प्रस्तावात विशिष्ट शिफारशी असतील.

२.२ शैक्षणिक संस्थाचे पात्रता निकष

रजिस्ट्रेशन अॅक्ट १९६०) खाली नोंदणीकृत असावी.

२.२.२ संस्थेकडे शैक्षणिक उपक्रम चालविण्याचा किमान अनुभव पुढील प्रमाणे राहील.

अ) प्राथमिक शाळा – ७ (सात) वर्षे

ब) माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा – १० (दहा) वर्षे

क) उच्च शिक्षण – १० (दहा) वर्षे

२.२.३ आवश्यक फर्निचर, साधने यासह शाळेची इमारत बांधण्याकरीता संस्थेचे आर्थिक स्थिती चांगली असावी. संस्थेने आपली आर्थिक स्थिती दर्शविणेकरीता अगोदरच्या तीन वर्षातील कामगिरीचे परिक्षित आर्थिक ताळेबंद (Audited Financial Results) सादर करावेत.

२.२.४ महानगरपालिकेने/राज्य शासनाने मंजूर केलेल्या वेतनश्रेणी नुसार अर्हताप्राप्त कर्मचारी नेमण्याची क्षमता संस्थेकडे असावी. सदर शैक्षणिक संस्थेला शासन मान्यता असावी. (अनुदानित / विनाअनुदानित)

२.२.५ संस्थेकडे शाळा चालविण्याकरीता होणारा खर्च करण्याची क्षमता असावी.

२.२.६ संस्थेची अगोदरच्या तीन वर्षाची शैक्षणिक कामगिरी समाधानकारक असावी. सदर शैक्षणिक कामगिरी शालांत परिक्षा, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा, विद्यापिठ परिक्षांच्या निकालानुसार पाहिली जाईल व संबधित निकाल हा मागील तीन वर्षाकरीता किमान ८० टक्के इतका असणे आवश्यक राहील. एका संस्थेला जास्तीत जास्त २ भूखंडाचे वितरण मनपा निर्णयानूसार ज्या संस्थांना भूखंड वितरीत केले आहे. त्यांनी मनपा शाळांचा दर्जा व शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी किमान ४ शाळा दत्तक घेणे आवश्यक राहील.

## ३) अटी व शर्ती

३.१ महानगरपालिकेच्या जमिनी/ भूखंड देतेवेळी जमीन भाडेपट्टयावर दिली जाईल व या संबंधीच्या अटी व शर्ती आयुक्त यांनी नमुद केल्यानुसार असतील व त्यामध्ये उपरोक्त अटीचा समावेश असेल. तसेच भाडेकरुंने विक्रेय/पणनयोग्य शिर्षकहक्क घेऊ नये अशीही अतिरिक्त अट असेल.

३.२ शैक्षणिक संस्थेला भूखंड अथवा/बांधकाम केलेली इमारत भाडेपट्टी अनुज्ञापन तत्वावर (लिज डीड) देण्यात येईल.

३.३ संस्थेला शैक्षणिक उपक्रम सुरू करण्याकरिता राज्य शासनाची मंजूरी मिळवावी लागेल व शिक्षण संचालकांनी अथवा तंत्रशिक्षण संचालक अथवा विद्यापिठाने मंजूर केलेल्या शिक्षण संहितेचे पालन करावे लागेल.

३.५ शैक्षणिक उपक्रमाच्या इमारतीचे बांधकाम आराखडे मंजूर झालेल्या व काम सुरू करण्याचे प्रमाणपत्र दिल्याच्या तारखेपासून ३ (तीन) वर्षाच्या आत पूर्ण करणे.

३.६ भूखंड दिल्यानंतर ३ (तीन) वर्षाच्या कालावधीत इमारत बांधणे संस्थेला शक्य नसल्यास संस्था चालकांनी नविन कार्यक्रम सादर करणे बंधनकारक राहील. काम सुरू करण्यापूर्वी सदर कार्यक्रम महापालिका आयुक्तांकडून मंजूर करुन घ्यावा लागेल व या करिता आयुक्त ठरवतील त्यानुसार आवश्यक त्या विलंब शुल्काचा भरणा करावा लागेल.

३.७ विशिष्ट तीन वर्षाच्या कालावधीत अथवा आयुक्तांनी मंजूर केलेल्या सुधारीत कार्यक्रमानुसार वाढविलेल्या कालावधीत संस्थेने इमारत बांधली नाही तर संसथेबरोबरचा भाडेकरार तीन वर्षानंतर आपोआप रद्द होईल व भूखंडाचा/सुविधेचा ताबा महानगरपालिका घेईल.

३.८ आरक्षित भूखंड/बांधीव सुविधांचा इमारतीचा वापर केवळ शैक्षणिक व शिक्षण अनुषांगिक प्रयोजनासाठी करता येईल.

३.९ शैक्षणिक इमारतीमध्ये सभागृह (Assembly Hall) बांधण्यास परवानगी दिली असल्यास, आयुक्तांनी विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसारच सदर सभागृह वापरण्यास परवानगी मिळेल.

३.१० प्रत्येक वर्षी शाळेत दिल्या जाणाऱ्या एकूण प्रवेशांपैकी २५% प्रवेश दुर्बल घटकांसाठी व १०% (अक्षरी दहा टक्के) प्रवेश महानगरपालिकेचे आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार असावा, शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश देणे बंधनकारक राहील. R.T.E. चे पालन करणे बंधनकारक राहील.

३.१०.१ विद्यार्थी / पालन यांसकडून कोणतेही प्रतिव्यक्त शुल्क (Capitation Fees) अथवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारचे अनधिकृत शुल्क आकारले जाणार नाही.

३.१०.२ जात, वर्ण, लिंग, धर्म तसेच ज्या परिसरातून विद्यार्थी येतात हे विचारात न घेता, सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना प्रवेश खुला राहील.

३.१०.३ स्थानिक अथवा इतर सर्व कर संस्थेने नियमित व विहीत मुदतीत अदा करणे बंधनकारक आहे.

३.१०.४ संस्थेला देण्यात आलेला भुखंड / बांधीव सुविधा या करीता आयुक्तांनी ठरविलेली भाडेपट्टी अनुज्ञापन शुल्क विहीत कालमर्यादेत प्रदान करावे लागेल. या व्यतिरिक्त आयुक्तांनी विहीत केलेले महानगरपालिकेचे सर्व कर/आकार/शुल्क संस्थेकरिता लागू होतील. ते वेळेत भरणे भरणा करणे बंधनकारक राहील.

३.१०.५ बांधलेल्या शाळेतील शिकविण्याचे माध्यम मराठी, हिंदी, इंग्लिश, उर्दु अथवा दुसऱ्या कोणत्याही मान्यताप्राप्त भाषा असतील. शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये मराठी विषय अनिवार्य असेल.

भुखंड वापरला गेल्यास संस्थेने महानगरपालिकेला कोणतेही शुल्क/भाडे/किंमत आकारू नये.

३.१०.७ ज्या संस्थेस भुखंड देण्यांत आलेला आहे अशा संस्थेस जमिन विकसित करणे शक्य न झाल्यास सदर जमिन दुसऱ्या शैक्षणिक संस्थेस हस्तांतरीत करण्यास परवानगी मिळणार नाही व मुळ भुखंड महानगरपालिकेच्या ताब्यात परत करावा लागेल.

३.१०.८ ज्या संस्थेला अनुज्ञप्तीधारक म्हणुन भुखंड/इमारत दिली आहे अशा संस्थेला भुखंड/इमारत दुसऱ्या कोणत्याही संस्थेस कोणत्याही पध्दतीने अंशतः अथवा पुर्णपणे पोटभाडेपट्टीने देता येणार नाही किंवा हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच त्याच्या वतीने कोणत्याही पध्दतीने शैक्षणिक उपक्रमाची व्यवस्था पाहण्याकरीता दुसऱ्या संस्थेला नेमता येणार नाही.

३.१०.९ मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शैक्षणिक वापरासाठी दिलेले भुखंड त्याच संस्थेला त्याच कारणासाठी वापरता येईल. त्या वापरात बदल केल्यास भाडेकरार आपोआप रद्द होऊन जागा आहे त्या स्थितीत मनपाच्या ताब्यात आली आहे, असे समजण्यात येईल व मनपा तातडीने अशी जागा / मालमत्ता ताब्यात घेईल.

३.११.१० भाडेपट्टी अनुज्ञापनाचा कोणत्याही अटीचा भंग झाल्यास, अथवा भाडेकरूने, अनुज्ञापन धारकाने (अटीचा भंग होणारी) कोणतीही गैरकृती केल्यास महानगरपालिका आयुक्तांनी आदेश दिल्यानुसार संस्थेला दिलेली जमिन रद्द करण्यात येईल व भाडेपट्टी अनुज्ञापन रद्द करून जागेतून संस्था रिक्त करून भुखंडाचा/इमारतीचा अथवा दोन्हींचा ताबा घेण्याचे स्वातंत्र्य आयुक्तांस राहील.

<u>४) शैक्षणिक सुविधेचा भुखंड/बांधिव सुविधा करीता भाडेपट्टी कराराची रक्कम आकारण्याची पध्दत.</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ नुसार भाडेपट्टी कराराची रक्कम बाजारभाव मुल्यापेक्षा अधिक असावी असे निकष आहेत. तथापी सदर कलमानुसार भाडे आकारण्यात बहुतांश शिक्षण संस्थांची बाजार मुल्यानुसार भुखंडाकरीता भाडे रक्कम देऊन भुखंड विकसित करणेकरीता आर्थिक क्षमता नसल्याने असे भुखंड विकसित करणेसाठी शैक्षणिक संस्था पुढे येणार नाही. त्यामुळे भाडयाबाबत सिडको, एम.एम.आर.डी.ए., म्हाडा या सारखी विशेष नियोजन प्राधिकरणे व मुंबई, पुणे या सारख्या महानगरपालिका यांचेकडील अस्तित्वातील धोरण विचारात घेऊन शैक्षणिक सुविधाकरीताचे भुखंड/बांधीव सुविधा वितरित व विकसित करण्यासाठी त्या धर्तीवर सर्वसमावेश धोरण प्रस्तावित करणे संयुक्तीक होईल. यास्तव भाडेकराराची रक्कम आकारणेकरीता पुढीलप्रमाणे कार्यपध्दती प्रस्तावित करण्यात येत आहे.

शासनाच्या शिघ्रसिध्द गणकानुसार भाडेपट्टा अधिमुल्य रकमेची परिगणना करण्यात यावी. सदरची परिगणना खालीलप्रमाणे असेल.

अ) प्राथमिक शाळा, माध्यमिकशाळा करीता, भाडेपट्टा अधिमुल्य = २५/१०० X { भुखंडाखालील क्षेत्राच्या जमिनीचे शासनाकडील शिघ्रसिध्द गणकानुसार मुख्य + बांधलेल्या स्वरुपातील इमारत असल्यास त्याचे शासनाकडील शिघ्रसिध्द गणकानुसार येणाऱ्या बांधकाम खर्चाची रक्कम }

ब) माध्यमिक व उच्च माध्यमिक शैक्षणिक सुविधा एकत्रित पुरविण्यात येणाऱ्या शाळेकरीता भाडेपट्टा अधिमुल्य = ५०/१०० X { भुखंडाखालील क्षेत्राच्या जमिनीचे शासनाकडील शिघ्रसिध्द गणकानुसार मुख्य + बांधलेल्या स्वरुपातील इमारत असल्यास त्याचे शासनाकडील शिघ्रसिध्द गणकानुसार येणाऱ्या बांधकाम खर्चाची रक्कम }

क) उच्च शिक्षण करीता भाडेपट्टा अधिमुल्य = ७५/१०० X { भुखंडाखालील क्षेत्राच्या जमिनीचे शासनाकडील शिघ्रसिध्द गणकानुसार मुख्य + बांधलेल्या स्वरुपातील इमारत असल्यास त्याचे शासनाकडील शिघ्रसिध्द गणकानुसार येणाऱ्या बांधकाम खर्चाची रक्कम }

ड) व्यावसायिक शिक्षणाकरीता भाडेपट्टा अधिमुल्य = ७५/१०० X { भुखंडाखालील क्षेत्राच्या जमिनीचे शासनाकडील शिघ्रप्रसिध्द गणकानुसार मुल्य + बांधलेल्या स्वरुपातील इमारत असल्यास त्याचे शासनाकडील शिघ्रप्रसिध्द गणकानुसार येणाऱ्या बांधकाम खर्चाची रक्कम }

वरील पध्दतीनुसार येणारी भाडेपट्टा कराराची एकुण देय रक्कम ही भुखंडाची/ बांधीव सुविधेची आधारभूत किंमत समजण्यात येईल. अर्हताप्राप्त शैक्षणिक संस्थांना या आधारभूत किंमतीनुसार त्यांचा देकार सादर करावयाच्या असून तो किमान आधारभूत किंमतीपेक्षा अधिक रकमेचा असणे आवश्यक राहील. आधारभूत किंमतीपेक्षा कमी किंमतीचे देकार रद्द समजण्यात येतील. पात्रतेचे निकष धारण करणाऱ्या ज्या संस्थेचा आर्थिक देकार सर्वात जास्त असेल अशा संस्थेची संबंधित भुखंड/ बांधीव सुविधा वितरण व विकसनाकरिता निवड केली जाईल.

किमान अर्हतांची पुर्तता केलेल्या व स्पर्धात्मक वितरण निविदेंमध्ये सहभागी झालेल्या एकापेक्षा अधिक शैक्षणिक संस्थाचे आर्थिक देकार (Financial Offer) सारखेच असल्यास तर खालील निकषानुसार संस्थेची निवड करण्यात येईल.

(अ) ज्या संस्थेच्या नोंदणीचा दिनांक अगोदरचा असेल.

(ब) जी संस्था स्थानिक असेल.

(ड) ज्या संस्थेचे अधिक शैक्षणिक उपक्रम असतील.

सर्वात जास्त आर्थिक देकारानुसार भुखंड/ बांधीव सुविधांची येणारे भाडेपट्टा अधिमुल्य हे विहित मुदतीत एक रकमी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे भरणा करणे अनिवार्य राहील. प्रस्तुत शैक्षणिक धोरणानुसार प्रस्तावित केलेली भाडेपट्टा अधिमुल्याची रक्कम ही एक रकमी न आकारता कमाल ५ समान वार्षिक हप्त्यामध्ये प्रथम पाच (५) वर्षात करारनाम्यामध्ये नमूद केल्यानुसार देण्याची सवलत देण्यात यावी.

निवड झालेल्या संस्थेस भाडेपट्टा अधिमुल्या व्यतिरिक्त प्रतिवर्ष रुपये १/- (अक्षरी रुपये एक मात्र) इतकी नाममात्र भाडे रक्कम भाडेकराराचे कालावधीसाठी आकारण्यात येईल.

उपरोक्त नुसार भाडे कराराची किमान रक्कम निश्चित केल्यास महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान न होता, शहरात दर्जेदार व पुरेशा प्रमाणात सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा विकसित करणे शक्य होईल.

<u>५) भुखंड वितरित करण्यांसाठी प्रशासकीय मंजुरी</u>

निवड झालेल्या शैक्षणिक संस्थांना भुखंड/ बांधीव सुविधा देणकरीता मा. महासभेची मंजुरी दिल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ नूसार चालू बाजारभावा पेक्षा कमी दर आल्यास त्यास शासनाची मान्यता घेतल्यानंतर संबंधित संस्थेने विभाग प्रमुख (मिळकत व्यवस्थापक विभाग) यांचे समन्वयाने महानगरपालिकेसोबत विहित नमुन्यातील करारनामा करणे बंधनकारक राहील. करारनामा केल्यानंतर सदर संस्थांना भुखंड/ बांधीव सुविधा महानगरपालिकेमार्फत हस्तांतरीत करणेत येतील.

वरील प्रमाणे प्रारुप धोरण अंतीम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि१२/०४/२०१७ वेळ स.१०.३० वा.
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ०३
दिनांक १२/०४/२०१७
नगरसचिव विभाग.

PC-3/DK/2017-18/MG-1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २६/०२/२०१६

### ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ८० :- मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मध्ये दुरुस्ती करणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ राज्य शासनाच्या राजपत्रात दि.१३ मार्च, २०१४ रोजी प्रसिध्द झाले आहे. सदरचे सेवा प्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना लागू झाले आहेत. महानगरपालिका आस्थापनेवर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये विविध संवर्गातील पदे मंजुर करण्यात आलेली आहेत.

दि.०५/०३/२०१६ रोजी शासनास मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम -२०१४ मधील दुरुस्त्या व नव्याने प्रस्तावित सेवा प्रवेश नियमांना शासन मान्यता देणेबाबत सादर केलेला आहे. सदर शासनास सादर केलेल्या प्रस्तावामध्ये उद्यान व वृक्षप्राधिकरण विभातील पदांच्या सेवाप्रवेश नियमाबाबत दुरस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०२/०७/२००८ रोजीच्या परिपत्रकात मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मध्ये दुरुस्ती करुन नव्याने सेवा प्रवेश नियम तयार करण्यासंबंधीची कार्यवाहीचा उल्लेख आहे. सदर परिपत्रकानुसार सेवा प्रवेश नियमात दुरुस्ती करणेसाठी खाली दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सेवा प्रवेश सेवा नियम (प्रारुप) तयार करणे | १ महिना |
| २ | सेवा प्रवेश नियमासंदर्भात ठराव पारीत करणे | २ आठवडे |
| ३ | प्रारुप सेवा प्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द करणे | १ आठवडा |
| ४ | हरकती/सूचना यासाठी देण्याचा कालावधी | २ महिने |
| ५ | प्राप्त हरकती/ सूचना मागवून त्यांचे निराकाण करुन शासन मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविणे | २ आठवडे |

वरीलप्रमाणे कार्यवाही करणेसाठी, ठराव पारित करुन, दुरुस्ती शासन राजपत्रात प्रसिध्द करुन "सुचना/हरकती मागवून" त्यांचे निराकरण करुन अंतिमतः शासनास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | सेवा भरती नियम २०१४ मधील अ.क्र. | सेवा भरती नियम २०१४ | | | प्रस्तावित बदल | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरीता अर्हता व पद्धती | | |
| १. | ५४. | वृक्षसवर्धन व उदयान अधिकारी/उदयान अधिक्षक श्रेणी-१ | | | **पदनामात बदल :-**<br>**मुख्य उदयान अधिक्षक**<br>**वेतन श्रेणी-१५६००-३९१०० ग्रेड पे-५४००** | शासनाचे नगरविकास विभागाचा शासन नि<br>मिभाप-<br>१११४/२५/प्र.क्र.०३/ २०<br>नवि-२८ दि.२१. मे, २०१४ नुसार मुख्य उदयान अधिक्षक वर्ग-<br>असे पदनाम असलेले पद मंजुर आहे. |
| | | | नामनिर्देशनाने | शासनमान्य कृषी विद्यापीठाची बी.एस्सी.(हॉर्टिकल्चर्स)/ॲग्रीकल्चर्स/बॉटनी/ फॉरेस्ट्री पदवी/शासनमान्य विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण. | **नामनिर्देशन (सरळसेवा)**<br>**मंजुर सेवा प्रवेश नियम २०१४ प्रमाणे**<br>शासन शासनमान्य कृषी विद्यापीठाची बी.एस्सी.(हॉर्टिकल्चर्स)/ॲग्रीकल्चर्स/बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी/शासनमान्य विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण | |

| अ. क्र. | सेवा भरती नियम २०१४ मधील अ.क्र. | सेवा भरती नियम २०१४ | | | प्रस्तावित बदल | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरीता अर्हता व पद्धती | | |
| | | | पदोन्नतीने १००% | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता या आधारे उप वृक्ष संवर्धन अधिकारी या संवर्गातून किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक. | **पदोन्नती १००%** नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे **उपमुख्य उदयान अधिक्षक** या सवर्गातुन किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक | महापालिका आस्थापनेवर **उपमुख्य उदयान अधिक्षक** हे पद मंजुर आहे. |
| २. | ५५. | उपवृक्षसंवर्धन व उदयान अधिकारी/उदयान उपअधिक्षक श्रेणी-१ | | | **पदनामात बदल :- उपमुख्य उदयान अधिक्षक श्रेणी-२ वेतन श्रेणी-९३००-३४८०० ग्रेड पे-४४००** | शासनाचे नगरविकास विभागाचा शासन निर्णय मिभाप-१११४/२५/प्र.क्र.०३/२०१४ नवि-२८ दि.२१ मे, २०१४ नुसार **उपमुख्य उदयान अधिक्षक श्रेणी-२**, असे पदनाम असलेले पद मंजुर आहे. |

| अ. क्र. | सेवा भरती नियम २०१४ मधील अ.क्र. | सेवा भरती नियम २०१४ | | | प्रस्तावित बदल | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरीता अर्हता व पद्धती | | |
| | | | नामनिर्देशनाने | शासनमान्य कृषी विदयापीठाची बी.एस्सी. (हॉर्टिकल्चर्स) /ॲग्रीकल्चर्स /बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी/शासनमान्य विदयापिठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण | **नामनिर्देशनाने (सरळसेवा) २५%** **मंजुर सेवा प्रवेश नियम २०१४ प्रमाणे** शासनमान्य कृषी विदयापीठाची बी.एस्सी. (हॉर्टिकल्चर्स) /ॲग्रीकल्चर्स /बॉटनी/फॉरेस्ट्रीपदवी/शासनमान्य विदयापिठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण | |
| | | | पदोन्नतीने १००% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे **सहाय्यक वृक्ष संवर्धन व उद्यान अधिकारी** या संवर्गात किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक | **पदोन्नतीने ७५%** नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे **सहाय्यक उदयान अधिक्षक/ उदयान अधिक्षक** या संवर्गातुन किमान ०५ वर्षाचा अनुभव | महापालिका आस्थापनेवर **सहाय्यक उदयान अधिक्षक / उदयान अधिक्षक** हे पद मंजुर आहे. |

| अ. क्र. | सेवा भरती नियम २०१४ मधील अ.क्र. | सेवा भरती नियम २०१४ | | | प्रस्तावित बदल | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरीता अर्हता व पद्धती | | |
| ३. | ५६. | सहाय्यक वृक्ष संवर्धन व उद्यान अधिकारी श्रेणी-२ | | | **पदनामात बदल :-**<br>**सहाय्यक उद्यान अधिक्षक/उद्यान अधिक्षक वर्ग-३** वेतन श्रेणी-९३००-३४८०० ग्रेड पे-४२०० | मंजुर सेवा प्रवेश नियम २०१४ मध्ये सहाय्यक वृक्ष संवध- व उदयान अधिकार्ि असे पदनाम आहे. परंतु शासनाचे नगरविकास विभागा शासन निर्णय मिभा १११४/२५/प्र.क्र.०३/ २०१४ नवि-२८ दि.२ मे, २०१४ नुसार सहाय्यक उद्यान अधिक्षक/ उद्यान अधिक्षक वर्ग -३ अस पदनाम असलेले पद मंजुर आहे. |
| | | | नामनिर्देशनाने | शासनमान्य कृषी विद्यापीठाची बी.एस्सी.(हॉर्टिकल्चर्स)/ ॲग्रीकल्चर्स/ बॉटनी/ फॉरेस्ट्री पदवी/शासनमान्य विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण. | **नामनिर्देशन (सरळसेवा)**<br>**मंजुर सेवा प्रवेश नियम २०१४ प्रमाणे**<br>शासन शासनमान्य कृषी विद्यापीठाची बी.एस्सी.(हॉर्टिकल्चर्स)/ॲग्रीकल्चर्स/बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी/शासनमान्य विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण. | |

| अ. क्र. | सेवा भरती नियम २०१४ मधील अ.क्र. | सेवा भरती नियम २०१४ | | | प्रस्तावित बदल | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरीता अर्हता व पद्धती | | |
| | | | पदोन्नतीने १००% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे **उद्यान सहाय्यक** या संवर्गात किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक. | **पदोन्नती १००%**<br>नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे **उदयान निरीक्षक** या संवर्गात किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक | महापालिका आस्थापनेवर **उदयान निरीक्ष** पद प्रस्तावित आहे. |
| | | | | | **पदनामात बदल :-**<br>**उदयान निरीक्षक**<br>**वेतन श्रेणी-५२००-२०२०० ग्रेड पे-२४००** | महापालिका आस्थापनेवर **उदयान निरीक्ष** पद प्रस्तावित |
| ४. | ५७. | उद्यान सहाय्यक श्रेणी-३ | नामनिर्देशन ७५% | शासनमान्य कृषी विद्यापीठाची बी.एस्सी.(हॉर्टिकल्चर्स)/ॲग्रीकल्चर्स/बॉटनी/ फॉरेस्ट्री पदवी/शासनमान्य विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण. | **नामनिर्देशन (सरळसेवा) ७५%**<br>**मंजुर सेवा प्रवेश नियम २०१४ प्रमाणे**<br>शासनमान्य कृषी विद्यापीठाची बी.एस्सी.(हॉर्टिकल्चर्स)/ॲग्रीकल्चर्स/बॉटनी/फॉरेस्ट्री पदवी/शासनमान्य विद्यापीठाची वनस्पती शास्त्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण. | |

| अ. क्र. | सेवा भरती नियम २०१४ मधील अ.क्र. | सेवा भरती नियम २०१४ | | | प्रस्तावित बदल | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरीता अर्हता व पद्धती | | |
| | | | पदोन्नती २५% | महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे प्रमुख माळी या संवर्गात ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक. | **पदोन्नती २५%**<br>अ) राज्य शासनाची उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण<br>ब) कृषि / उद्यान विद्या यातील पदवीका.<br>क) महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे **हेड माळी** या संवर्गात ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. | महापालिका आस्थापनेवर **हेड माळी** हे पद मंजुर आहे. |
| ५. | ५८. | प्रमुख माळी श्रेणी-४ | | | **पदनामात बदल :-**<br>**हेड माळी श्रेणी-३**<br>**वेतन श्रेणी-५२००-२०२०० ग्रेड पे-१९००** | महापालिका आस्थापनेवर हेड **माळी** हे पद **श्रेणी-३** मध्ये मंजुर आहे. |
| | | | नामनिर्देशन | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालान्त परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) माळी व्यवसायाचा १ वर्षाचा कृषी विद्यापीठाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम पूर्ण. | **नामनिर्देशन (सरळसेवा) ५०%**<br>**मंजुर सेवा प्रवेश नियम २०१४ प्रमाणे**<br>अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालान्त परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) माळी व्यवसायाचा १ वर्षाचा कृषी विद्यापीठाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम पूर्ण. | |

| अ. क्र. | सेवा भरती नियम २०१४ मधील अ.क्र. | सेवा भरती नियम २०१४ | | | प्रस्तावित बदल | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरीता अर्हता व पद्धती | | |
| | | | पदोन्नती | अ) इयत्ता ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महापालिका आस्थापनेवरील जेष्ठता व गुणवता यांच्या आधारे माळी या पदावर किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक. | **पदोन्नती ५०%**<br>**नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवता यांच्या आधारे माळी/चतुर्थ श्रेणी कर्मचारी या संवर्गातील किमान ५ वर्षाचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्यांमधुन पदोन्नतीने नेमणुक** | |

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४मध्ये वरील प्रमाणे केलेल्या दुरुस्तीस मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ. नरेश गिते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 29/09/2016 वेळ ...
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर ज. क्र. ....२९....
लिपिक
नगरसचिव विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (९) - <u>आगरी समाज उन्नती संस्थेस जागा देणेबाबत फेरप्रस्ताव सा</u> करणेबाबत.**

**ठराव क्र. (   )**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र. 122 हे आरक्षण "Playground & Social Forestry" [खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण] या नावाने प्रस्तावित असून मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र 46700.00 चौ.मी. आहे. यापैकी 35182.60 चौ.मी. महानगरपालिकेच्या ताब्यात असून सदर आरक्षणातील 2.0 एकर जागा आगरी समाज उन्नती संस्था यांना भाडेतत्वावर देणेसाठी व भाडे निश्चित करणेबाबत मा. महासभेची मंजूरी आवश्यक असल्याने यापुर्वी तत्कालीन महासभेस दि.20/07/2011 रोजी गोषवारा सादर केला होता. त्याअनुषंगाने दि.29/07/2011 (दि.20/07/2011 ची तहकूब सभा) रोजीच्या मा. महासभेने सदर प्रकरणी महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये आरक्षणात फेरबदल करणेचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेसाठी ठराव क्र. 42 अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर ठरावाप्रमाणे नियमाप्रमाणे सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन मंजूरीसाठी मा. शासनास पत्र क्र. मनपा/नर/4104/2011-12, दि.28/03/2012 अन्वये सादर करणेत आला असता सदर प्रकरणी अनुषंगाने मा. शासनाने शासन निर्णय क्र. टिपीएस-1213/1813/प्र.क्र. 231/13/नवि-12, दि.30/01/2014 अन्वये सदर फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर केलेला आहे.

तसेच सदर आ.क्र. 122 (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या आरक्षणामध्ये हिंदु हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे संस्कृतिक भवन व कला दालन उभारणेस व त्यासाठी येणा-या खर्चास आर्थिक मंजूरी मा. महासभा दि.19/05/2017 प्रकरण क्र. 6, ठराव क्र. 6 अन्वये प्राप्त आहे. सदर आरक्षण मिश्र स्वरुपाचे असल्यामुळे त्यामध्ये अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र (10% तळ + 5% पहिला मजला) यांचे मर्यादित बांधकाम करणेसाठी व त्याअनुषंगीक मा. महासभेच्या ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत मार्गदर्शन मिळणेसाठी शासनास पत्र क्र. मनपा/नर/2990/2017-18, दि.18/11/2017 अन्वये विनंती करणेत आलेली असून याबाबत अद्याप मार्गदर्शन / मंजूरी प्राप्त नाही.

मा. महापौर यांचे संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने वरिलप्रमाणेची वस्तुस्थिती विचार विनिमय करुन निर्णय होणेसाठी फेरप्रस्ताव मा. महासभेस सादर.

(डॉ. नरेश गिते )
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव विभाग,

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. (८३) :- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पावसाळयापूर्वी कच्चे/पक्के नाले सफाई करणे. (आरोग्य विभाग)**

मिरा भाईदर महानगरपालिके एकुण क्षेत्र ७९ चौ.किमी आहे. महानगरपालिका क्षेत्रालगत असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उधानातून पावसाळया दरम्यान पावसाळी पाण्याचा निचरा शहरात असलेल्या नाल्यातून घोडबंदर खाडीमध्ये होतो.

पावसाळी व सांडपाण्याचा निचरा करण्याकरीता शहरात एकूण १५५ कच्चे व पक्के नाले आहेत.महानगनपालिकेने एकात्मीक नाले बांधणे या योजनेअंतर्गत बहूतांशी नाले पक्या स्वरुपाचे रुंद व खोल बांधलेले आहे. काही ठिकाणी कच्चे नाले खोदून पावसाळी पाण्याचा निचरा घोडबंदर खाडीत करण्यात येत असतो.

शहरातील काही नाल्यालगत इमारती व घरे असल्याने यंत्र सामुग्रीध्दारे नाले सफाई करणे शक्य होत नाही.याकरीता कंत्राटी मजुरामार्फत नाले सफाई केली जाते.

दरवर्षी महानगरपालिके तर्फे पावसाळयापूर्वी नाले सफाई करणे करीता आवश्यक असलेले यंत्रसामुग्री जे.सी.बी.मशिन, पोकलन मशिन,बोट पोकलन,हायड्रा, जेटींग मशिन, सिव्हर सक्कर मशिन व गाळ उचलण्याकरीता डंपर,टोरस,तसेच कंत्राटी मजूर पुरवठा करण्याकरीता निविदा मागविल्या जात आहे.आवश्यकतेनुसार नाले सफाई करण्याकरीता यंत्रसामुग्री व मनुष्यबळाचा वापर करुन सार्व.आरोग्य विभागामार्फत काम पुर्ण केले जातात.

पावसाळयापूर्वी नाले सफाई करणे करीता खालीलप्रमाणे मागील तीन वर्षात खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र | कामाचे स्वरुप | सन २०१५-०१६ | सन २०१६-१७ | सन २०१७-१८ |
|---|---|---|---|---|
| ०१ | पावसाळयापूर्वी कच्चे/पक्के नाले सफाई करणे | रु. १.५० कोटी | रु. २.२० कोटी | रु. २.६० कोटी |

मागील सन २०१५-१६, सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षातील खर्च पाहता सन २०१८-१९ मध्ये १५% वाढ खर्चात अपेक्षित आहे त्या अन्वये **रु.३.०० कोटी** इतका खर्च सन २०१८-१९ करिता अपेक्षित आहे. सदर नालेसफाईची कामे पावसाळयापुर्वी करणे अत्यावश्यक आहेत.

तरी, सदर पावसाळयापुर्वी नालेसफाई कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईदर महानगरपालिका

# बांधकाम विभाग

# // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ८४ )** :- रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते. चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याकरीता सन्मानीय नगरसेवक / नगरसेविका यांना पत्र देऊन प्रस्ताव मागविण्यास आले होते. त्यांच्याकडुन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यापुर्वी झालेले नामकरण वगळात खालील प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | मिरागांव येथील हनुमान मंदिर समोरील चौक | कै. यशवंत केशव भोईर चौक |
| २ | मिरारोड प्रभाग क्र. १५ मध्ये डॉन-बोस्को स्कुल पासुन ते सरळ डायमंड टॉवर हायवे पर्यंत मार्ग | पंडित दीनदयाल उपाध्याय मार्ग |
| ३ | भाईंदर (पुर्व) नवघर रोड आरक्षण क्र. १०९ या जागेतील आभ्यासीका | सावित्रीबाई फुले अभ्यासिका |
| ४ | प्रभाग क्र. ११ नवघर रोड येथे लताकुंज गल्ली | कै. लता रामचंद्र पाटील मार्ग |

वरील नामकरण प्रस्तावाबाबत विचार विनिमय करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील प्रकरण ११ (२) अन्वये मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(डॉ.नरेश गीते)**
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-2/DK/MS/2017-18 /MG-6

जाहिरात विभाग

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि२६/०२/२०१८

## //गोषवारा //

**प्रकरण क्र. ८५ :- जाहिरात विभागाच्या उत्पन्नाबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध व्यक्ती/संस्था/कंपनी यांना महानगरपालिकेच्या जागेवर ठेक्याद्वारे होर्डिंग्ज वर जाहिरात उभारण्याची परवानगी देण्यांत येत असते. तसेच काही व्यक्ती/संस्था/कंपनी यांना खाजगी जागेत मालकी हक्काबाबतची कागदपत्रे तपासुन खाजगी जागेवर होर्डिंग्ज उभारण्यास परवानगी देण्यांत येत असते. महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार जाहिरात फी आकारुन त्याची वसुली करण्यांत येते.

यापूर्वी मा.स्थायी समिती ठराव क्र.43 दि.29/02/2008 नुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरातीचे (विविध भागात होर्डिंग्ज व अन्य प्रकारच्या जाहिराती) सर्वेक्षण करुन जाहिरातीचे नविन स्त्रोत उपलब्ध करण्याकरीता व उत्पन्न वाढ होण्याच्या दृष्टीने जाहिरात फी चे सुधारीत दरपत्रक तयार करुन मा.महासभेच्या मंजुरीकरीता ठेवले होते. त्याअनुषंगाने मा.महासभा ठराव क्र.35 दि.29/03/2008 रोजी सुधारीत दरपत्रकास मान्यता दिली होती. मंजुर दरपत्रकानुसार जाहिरात विभागाने अंमलबजावणी करुन जाहिरात फी वसुल करण्यात आली होती.

तद्नंतर नविन वाढीव दराबाबत प्रशासनाशी विचार विनिमय न करता महासभेमध्ये 'ज' चा प्रस्ताव सादर करण्यांत आला होता. त्यानुसार मा.महासभा दि.19/07/2014. ठराव क्र.27 अन्वये जाहिरात फी चा वाढीव दराबाबत ठराव पारित करण्यांत आला. परंतु संबंधित परवानगी धारक एजन्सींनी जुन्या जाहिरात फी दराप्रमाणे जाहिरात फी महसूलाचा भरणा करीत होते. व त्याबाबत मिरा भाईंदर आऊटडोअर असो. यांनी मा.महासभा दि.19/07/2014 ठराव क्र.27 मधील दर कमी करणे बाबत दि.18/02/2015 रोजीच्या पत्राने कळविले होते.

जाहिरात दरात जास्त पटीने वाढ केली त्यामुळे याअगोदर देण्यांत आलेल्या ठेका वरील जाहिरात होर्डिंग्जच्या परवानग्या व खाजगी होर्डिंग्जच्या परवानग्या यामागील दराने दिल्या असल्याने एकदम जास्तची जाहिरात फी भरण्यास विरोध केला होता. त्याच्या परीणाम जाहिरात फी वसुलीवर होत होता.

आजुबाजुच्या सर्व महानगरपालिका क्षेत्रामध्ये असलेल्या जाहिरात फीची तुलना करता मिरा-भाईंदर महानगरपालिकेची जाहिरात फी जास्त असल्याने तत्कालीन आयुक्त सो. यांनी मा.महासभेच्या दरापेक्षा दर कमी करुन देखील ते इतर महानगरपालिकेच्या दरापेक्षा जास्तचे ठेवून त्याचा प्रस्ताव दि.20/02/2016 रोजी मा.नगरसचिव, सचिव विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे मा.महासभेसमोर जाहिरात फी बाबतचा विषय ठेवण्याकरीता दिला होता. परंतु तत्कालीन मा. महासभेने तो प्रस्ताव विषयपटलावर न

घेतल्याने तत्कालीन मा.आयुक्त सो. यांनी मा.महासभा दि. 19/07/2014 ठराव क्र.27 अन्वये पारीत केलेला ठराव रद्द करुन प्रशासनाने प्रस्तावीत केलेल्या गोषवाऱ्यात नमुद (सुधारीत) जाहिरात दर पत्रकास दि.01/08/2014 पासुन भुतपूर्वलक्षी प्रभावाने जाहिरात फी वसुलीस मान्यता मिळावी याकरीता मा.प्रधान सचिव -2, नगरविकास विभाग यांच्याकडे पत्रव्यवहार केला.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि 'ड' मधिल प्रकरण क्र.2 'स' मधील तरतुदीनुसार मानीव मान्यतेनुसार प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावित दरानुसार जाहिरात फी ची दि.01/08/2014 रोजी पासुन वसुली करण्यास सुरुवात केलेली आहे. त्याअनुषंगाने सन 2017-18 या आर्थिक वर्षात एकुण मागणीच्या 65% जाहिरात फी वसुल झालेली आहे. उर्वरीत 35% जाहिरात फीची वसुली दि.31/03/2018 रोजीपर्यंत होणे अपेक्षीत आहे.

| जाहिरातीचा प्रकार | मा.महासभा ठराव क्र.35 दि.19/03/2008 रोजी मंजुर झालेली जाहिरात फी (प्रती चौ.फुट प्रती माह) | मा.महासभा ठराव क्र.27 दि.19/07/2014 रोजी मंजुर झालेली जाहिरात फी (प्रती चौ.फुट प्रती माह) | मा.महासभेसमोर प्रशासनाने सादर केलेले जाहिरात फी. (प्रती चौ.फुट प्रती माह) | शासनास सादर केलेले व मानीव मान्यतेने चालु केलेली जाहिरात फी (प्रती चौ.फुट प्रती माह) |
|---|---|---|---|---|
| किऑस्क | 40 | 60 | 60 | 60 |
| ठेका होर्डिंग्ज | 8 | 40 | 30 | 30 |
| खाजगी होर्डिंग्ज | 8 | 60 | 30 | 30 |
| कमानी | 8 | 60 | 30 | 30 |
| कॅन्टीलिवर | 8 | 60 | 30 | 30 |

(वरील नमुद केलेले दर हे 200 चौ.फुट आकारमानापर्यंतचे आहेत. आकारमानात वाढ झाल्यास दर टप्याटप्याने कमी होत जातात.)

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या निश्चित केलेल्या स्वतःच्या जागेवर वरील नमुद दराप्रमाणे ठेक्याने निविदा काढण्यांत येते. त्यात स्पर्धा होवून जास्त दर प्राप्त होतात. परंतु खाजगी जागेवर नमुद दरानुसार जाहिरात फी वसुली करण्यांत येते तसेच संबंधितांना खाजगी जागेचे भाडे जागा मालकास अतिरीक्त द्यावयाचे असल्याने त्यांच्या कडून निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त दर घेता येत नाहीत. याप्रकारची पध्दत सर्व महानगरपालिकेत कार्यरत आहे.

इतर महानगरपालिकेचे जाहिरात फी चे दर पहाता मिरा-भाईदर महानगरपालिकेतील जाहिरात फी वसुल करीत असलेले दर नक्कीच तुलनेने जास्त आहेत. त्यामुळे यापेक्षा जास्त दरात वाढ करावी किंवा कसे तसेच जाहिरात फलक प्रसिध्द करणे याबाबत धोरण ठरवणे इत्यादीबाबत मा. महासभेत विचार विनिमय होवून निर्णय घेणेस शिफारस आहे.

माधव कुरडकर 7/2/18

अतिरीक्त आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.6/2/2018 वेळ 10.20
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र....62......
लिपीक
नगरसचिव विभाग.

# इतर महानगरपालिका जाहिरात फी वसुली दर तुलनात्मक तक्ता

## जाहिरात फी चे दर

## (अे मार्गश्रेणी दराप्रमाणे)

# सन २०१६-१७

| अ.क्र | जाहिरातीचे प्रकार | मोजमाप | भिवंडी निजामपूर मनपा | ठाणे मनपा | उल्हासनगर मनपा | कल्याण डोंबिवली मनपा | वसई – विरार मनपा | मा.महासभा दि.१९/०३/२००८ ठराव क्र. ३५ नुसार दर (रुपये) | मिरा-भाईंदर मनपा मा.महासभा दि.१९/०७/२०१४ ठराव क्र. २७ अन्वये सुधारीत जाहिरात दर | मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने वसुल करील असलेले जाहिरात दर | प्रस्तावित दर प्रती चौ.फुट प्रती महिना | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मार्गश्रेणी अ प्रमाणे | प्रति चौ.फुट प्रति महिना | प्रति चौ.फुट प्रति महिना (जुना दर) | प्रति चौ.फुट प्रति महिना | प्रति चौ.फुट प्रति महिना | प्रति चौ.फुट प्रति महिना | प्रति चौ.फुट प्रति महिना | | | अ | ब | क |
| २ | होर्डिंग्ज (आकाशचिन्ह) | | | | | | | | | | | | |
| | आकाशचिन्ह (होर्डींग) मनपा जागेत निविदा प्रक्रियाद्वारे | १ - २०० | १०/- | १२/- | १२.५०/- | २२.५/- | ३/- | ८ | ४० | ३० | | | |
| | | २०१ - ३०० | ८ | १०.५० | १२.५०/- | १२.५०/ | ३/ | ६ | ४० | २६ | | | |
| | | ३०१ - ३५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ४० | २२ | | | |
| | | ३५१ - ४०० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ४० | १८ | | | |
| | | ४०१ - ४५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ४० | १६ | | | |
| | | ४५१ - अधिक | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ४० | १४ | | | |
| | आकाशचिन्ह (होर्डींग) व्यक्तिगत /खाजगी संस्था यांना मनपा जागेत किंवा सार्वजनिक रस्त्यालगत निविदा प्रक्रियाद्वारे | १ - २०० | १०/- | १२/- | १२.५०/- | २२.५/- | ३/ | ८ | ६० | ३० | | | |
| | | २०१ - ३०० | ८ | १०.५० | १२.५०/- | १२.५०/ | ३/ | ६ | ६० | २६ | | | |
| | | ३०१ - ३५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ६० | २२ | | | |
| | | ३५१ - ४०० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ६० | १८ | | | |
| | | ४०१ - ४५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ६० | १६ | | | |
| | | ४५१ - अधिक | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ६० | १४ | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाजगी जागा/इमारत जाहिरात इ. ठिकाणावरील आकाशचिन्ह (होर्डिंग) | १ — २०० | १०/- | १२/- | १२.५०/- | २२.५/- | ३/ | ८ | ३० | ३० | |
| | | २०१ — ३०० | ८ | १०.५० | १२.५०/- | १२.५०/ | ३/ | ६ | ३० | २६ | |
| | | ३०१ — ३५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ३० | २२ | |
| | | ३५१ - ४०० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ३० | १८ | |
| | | ४०१ — ४५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ३० | १६ | |
| | | ४५१ - अधिक | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ३० | १४ | |
| | कमानी कायमस्वरुपी महानगरपालिकेच्या जागेत) दिशादर्शक बंधनकारक आहे. | १ — २०० | १०/- | १२/- | १२.५०/- | २२.५/- | ३/ | ८ | ६० | ३० | |
| | | २०१ — ३०० | ८ | १०.५० | १२.५०/- | १२.५०/ | ३/ | ६ | ६० | २६ | |
| | | ३०१ — ३५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ६० | २२ | |
| | | ३५१ - ४०० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ६० | १८ | |
| | | ४०१ — ४५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ६० | १६ | |
| | | ४५१ - अधिक | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ६० | १४ | |
| | कॅन्टीलिव्हर पोल (प्रकाशित होर्डींग) मनपाच्या जागेत किंवा रस्त्यालगत | १ — २०० | १०/- | १२/- | १२.५०/- | २२.५/- | ३/ | ८ | ६० | ३० | |
| | | २०१ — ३०० | ८ | १०.५० | १२.५०/- | १२.५०/ | ३/ | ६ | ६० | २६ | |
| | | ३०१ — ३५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ६० | २२ | |
| | | ३५१ - ४०० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ६० | १८ | |
| | | ४०१ — ४५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ६० | १६ | |
| | | ४५१ - अधिक | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ६० | १४ | |
| | प्रदुषण व वातावरण नियंत्रण दर्शक व जाहिरात फलक (होर्डिंग) | १ — २०० | १०/- | १२/- | १२.५०/- | २२.५/- | ३/ | ८ | ४० | ३० | |
| | | २०१ — ३०० | ८ | १०.५० | १२.५०/- | १२.५०/ | ३/ | ६ | ४० | २६ | |
| | | ३०१ — ३५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ४० | २२ | |
| | | ३५१ - ४०० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ४० | १८ | |
| | | ४०१ — ४५० | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/- | ३/ | ५ | ४० | १६ | |
| | | ४५१ - अधिक | ८ | ९ | १२.५०/ | १२.५०/ | ३/ | ५ | ४० | १४ | |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.२६ /02/2018**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (८६) - <u>महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 52क</u> नुसार अनधिकृत बांधकामाचे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम 158(1) अन्वये शासनाने केलेले नियम प्रसिध्द करणेबाबत.**

शासनाचे नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र. टिपीएस-1814/प्र.क्र.82/14/ नियम/नवि-13, दि.07/10/2017 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 52क नुसार अनधिकृत बांधकामे "प्रशमन आकार" लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करावी म्हणून अधिसूचना प्रसिध्द झाली आहे. त्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 158 अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारा अंतर्गत Maharashtra Town Planning (Compounded Structure) Rules 2017 ही नियमावली तयार केलेली आहे. याममध्ये नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीनुसार दि.31/12/2015 पर्यंत किंवा त्यापुर्वीची झालेली अनधिकृत बांधकामे "प्रशमित संरचना" (Compounded Structure) म्हणून घोषित करून पुढील कार्यवाही करण्याबाबतची नियमावली लागू केलेली असून सदरची अधिसूचना प्रसिध्द झाली आहे. सदरची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून त्यातील नियमावली क्र. 9 नुसार नियोजन प्राधिकरण म्हणजेच मिरा भाईंदर महानगरपालिका, सदर नियमावली नुसार अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासून 6 महिन्याच्या आत, जनतेच्या अवलोकनार्थ व प्रसिध्द नमुन्यानुसार "प्रशमित संरचना" अंतर्गत विचारात घ्यावयाच्या बांधकामाबाबत अर्ज मागविण्यासाठी वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर जाहिर प्रसिध्दी करणे मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्रमप्राप्त आहे.

सबब सदर प्रकरणी जाहिर प्रसिध्दी करणेसाठी मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गिते)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महा[illegible] [illegible] २५/०७/ [illegible]

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक. ( ८७ ) :-** भाईंदर (पूर्व) नवघर नाका परिसराचे सुशोभिकरण व स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक बांधणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) नवघर नाका सुशोभिकरण करणे व स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक बांधणे कामाचा गोषवारा मा. महासभेत ठेवण्यासाठी सादर करण्यासाठी मा. महापौर तसेच नगरसेविका यांनी कळविलेले असून मा.श्रीम. प्रभात पाटील यांनी देखिल पत्रव्यवहार केला आहे.

भाईंदर (पूर्व) नवघर नाका येथे नवघर मराठी शाळा व हनुमान मंदिर मधील रस्ता विकास योजनेत 18.00 मीटर रुंदीचा असून सदर रस्त्यालगत नवघर शाळा, हनुमान मंदिर, एस.एन. कॉलेज रोड, नवघर स्मशानभूमी व नवघर दत्त मंदिरकडे जाणारे रस्ते एकत्र येतात. सदर नवघर चौकाचे फॅनिंग व रुंदीकरण करावयाचे असून तद्नंतर सदर ठिकाणी चौकाचे सुशोभिकरण काम करता येईल.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नवघर येथे स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक होण्यासाठी मागणी होत आहे. तरी सदर स्मारक होण्यासाठी सर्वेक्षण करुन जागा निश्चित करणे तसेच सुशोभिकरण कामाचा आराखडा तयार करावा लागेल. तसेच सदर स्मारक बांधण्यासाठी सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात लेखाशिर्ष तयार करावा लागेल. तद्नंतर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकरणाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करता येईल.

वरील वस्तूस्थिती सादर करण्यात येत आहे.

**(बी.जी. पवार)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-2/DK/2017-18/MG-7

नोंद रजिस्टर अ. क्र. ८४

लिपिक ११/०२/२०१८

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २६/०२/2018

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (89) :- भाईंदर (पूर्व), भाईंदर (पश्चिम), राई, मुर्धे, डोंगरी, तारोडी व उत्तन या परिसरातील महसुली गावांचा बाकी राहिलेला सिटी सर्व्हे करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण 19 महसूली गावांचा समावेश होत असून महानगरपालिकेचे एकूण क्षेत्रफळ 79.40 चौ.कि.मी. एवढे आहे.

शासन निर्णय क्र. नभूमा/1005/1605/प्र.क्र.11/ल-1, दि.30/01/2007 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचे नगरभूमापन खाजगी संस्थेद्वारे करुन घेणेबाबत मंजूरी मिळालेली आहे. त्याप्रमाणे विहीत कार्यपध्दतीनुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करुन 1 कोटी 32 लक्ष या निविदे दरात काम पुर्ण करणेबाबत पुढील तीन खाजगी संस्थेची नियुक्ती करणेत आलेली आहे.

1. मे. राणे मॅनेजमेंट कन्सलटंट प्रा.लि., भाईंदर
2. मे. मोनार्च सर्व्हेअर ॲन्ड कन्सलटंट प्रा.लि., पुणे
3. मे. पी.एन. शिदोरे ॲन्ड कंपनी, कल्याण

व त्यांस दि.25/01/2007 रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सदर खाजगी संस्थेने त्यांचेकडील कामकाज पूर्ण करुन कामाबाबतचा अहवाल तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचे कार्यालयात सादर केलेला आहे. सदर खाजगी संस्थेने पूर्ण केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत अधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांनी दि.03/02/2009 रोजी महानगरपालिकेस पत्र दिलेले होते व त्याप्रमाणे महानगरपालिकेने संबंधीतास रु.74,03,673/- देयक अदा केलेले आहे. दि.25/01/2007 रोजीच्या कार्यादेशानुसार मोजणीचे काम पूर्ण करण्याचा कालावधी कार्यादेश दिलेल्या दिनांकापासून 49 आठवडयाचा होता. हा कालावधी यापूर्वीच संपुष्टात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण 19 महसूली गावांपैकी मौजे उत्तन, डोंगरी, पाली, तारोडी, चौक या पांच गावांचे सर्व्हेक्षण काम स्थानिक नागरीकांच्या विरोधामुळे खाजगी संस्थेमार्फत नमुद कालावधीत होवू शकलेले नाही. याबाबत तत्कालीन मा. जमाबंदी आयुक्त, यांचे दालनातील दि.21/12/2010 रोजीच्या आयोजित बैठकीत मा. जमाबंदी आयुक्त यांनी सदर प्रकरणी भूमापन न झालेल्या पांच गावांबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेने जातीने लक्ष घालून संबंधीत खाजगी संस्थेस मदत करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

सदर सूचनेच्या अनुषंगाने मा. आमदार, मा. महापौर, मा. उप-महापौर, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. गटनेता, मा. विरोधी पक्षनेता, सदर गावांतील स्थानिक नगरसेवक व लोकप्रतिनीधी तसेच जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, ठाणे व उप-अधिक्षक, भूमि अभिलेख, ठाणे यांनी दि.19/01/2011 रोजी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे दालनात बैठकीस बोलाविण्यात आले होते.

सदर बैठकीस उपस्थित स्थानिक नेते व लोकप्रतिनिधी यांनी नियुक्त खाजगी संस्थेस उपरोक्त पांच गावांचे नगरभूमापन करणे करिता सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले होते व तद्अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि मा. संचालक, भुमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांस महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/1861/11-12 दि.16/09/2011 अन्वये उपरोक्त 5 गावांतील नगर भूमापना बाबतच्या कामाची वस्तुस्थिती कळवून यापूर्वी महानगरपालिका क्षेत्रातील मोजणी पूर्ण झालेल्या 14 गावांबाबत (भाईंदर, नवघर, गोडदेव, खारी, काशी, घोडबंदर, मिरा, महाजनवाडी, पेणकरपाडा, राई, मुर्धे, मोरवा, चेणा, वरसावे) चौकशी अधिकारी (Inquiry officer) नेमून नगर भूमापनाचे काम पूर्ण करणेबाबत कळविले होते.

मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचे अध्यक्षतेखाली दि.16/03/2012 रोजी शहरातील नगरभूमापनाबाबत आढावा बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीत महानगरपालिका क्षेत्रातील ज्या 5 गावांची मोजणी जनतेच्या विरोधामुळे शिल्लक आहे. त्याबाबत जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांनी व संबंधीत खाजगी संस्थेने आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची भेट घेऊन मोजणी संदर्भात काम पूर्ण करणेची कार्यवाही करावी व मोजणी झालेल्या 14 गावांपैकी 4 गावांचे चौकशी काम जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर यांचे जिल्ह्यातील उप-अधिक्षक भूमि अभिलेख, नगर भूमापन अधिकारी यांचेकडून करुन घेणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तद्नंतर उपरोक्त प्रकरणात दि.09/01/2013 रोजी मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दालनात आयोजित बैठकीत मिरा भाईंदर महानगरपालिकेतील मोजणी न झालेल्या पाच गावांचे मोजणीचे काम मे 2013 पर्यंत पूर्ण करुन घेणेबाबतची कार्यवाही उप-संचालक, भूमि अभिलेख, जिल्हाधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांनी करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सविस्तर मोजणी झालेल्या 14 गावांचे चौकशीचे काम शासनाकडून चौकशी अधिकारी यांची आस्थापना मंजूर झाल्यानंतर सदरचे काम हाती घेणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

तथापी आजमितीस मोजणी न झालेल्या 5 गावांचे (उत्तन, पाली, चौक, डोंगरी, तारोडी) मोजणी काम सुरु झालेले नाही. तसेच मोजणी झालेल्या उर्वरीत 14 गावांपैकी सद्यस्थितीत नवघर या गावाच्या चौकशीचे काम सुरु असल्याचे समजते.

महानगरपालिका क्षेत्रातील गावठाण जागेच्या सनद अभावी गावठाण क्षेत्रातील ग्रामस्थ / रहिवाश्यांच्या जुन्या घराच्या पुर्नःबांधणी प्रस्तावात कार्यवाही करणे अडचणीचे होत आहे. तसेच शहरातील मा. आमदार, स्थानिक नगरसेवक व लोकप्रतिनिधी यांचेकडून नगरभूमापन कामाबाबत सातत्याने महानगरपालिकेकडे पाठपुरावा केला जात आहे. त्यामुळे भूमि अभिलेख विभागामार्फत मोजणी पूर्ण झालेल्या सर्व 14 गावांसाठी चौकशी अधिका-यांची नेमणूक करुन चौकशी अधिकारी (Inquiry Officer) यांच्या कामाची कालमर्यादा ठरवून त्याप्रमाणे नगरभूमापनाचे काम प्राधान्याने पूर्ण करुन घेण्याबाबत तसेच मोजणी न झालेल्या 5 गावांची मोजणी सुरु करणेबाबत इकडून पत्र क्र. मनपा/नर/3425/2014-15, दि.16/03/2015 अन्वये मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, 3 रा मजला, विधान भवनासमोर, पुणे यांना पत्र देण्यात आलेले आहे.

तरी याबाबत संबंधित गावातील लोकप्रतिनिधी, मा. आमदार महोदय, मा. महापौर महोदया, मा. उप-महापौर, मा. महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, जसे मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. गटनेता, मा. विरोधी पक्षनेता सदर गावातील स्थानिक नगरसेवक, मा. आयुक्त सो., तसेच सर्व संबंधित कार्यालयाचे अधिकारी यांचेसमवेत बैठक आयोजित करुन मोजणीबाबत पुढील रुपरेषा आखून पुढील कार्यवाही करणे योग्य होईल.

उपरोक्त गोषवारा मा. महासभेपुढे अवलोकनार्थ व पुढील निर्णयार्थ सादर.

(बी.जी. पवार )
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. / /20 वेळ.........
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ..........................

लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## बांधकाम विभाग
## मा. महासभा दि.२६/०५/2018
## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक ( ९० ) :- भाईंदर पश्चिम व पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे कामाबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस शासनाच्या "मुलभूत सोई सुविधांचा विकास" योजने अंतर्गत खालील कामांना दि.11 जुलै 2017 रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

1) भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.2.00 कोटी

2) भाईंदर पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.1.00 कोटी

वरील प्रमाणे भाईंदर पश्चिम व पूर्व रेल्वे स्टेशन समोर रस्ता रुंदीकरण करणेची कामे केल्याने मूळ सुशोभिकरण करणे कामाच्या क्षेत्रात वाढ झाल्याने शासनाने मंजूर केलेल्या वरील अनुदानातून सुशोभिकरणाची कामे पूर्ण करणे शक्य नाहीत. त्यामुळे सदर कामाच्या जागेच्या ठिकाणी कामे करण्यासाठी नव्याने अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

1) भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.8,00,75,713/-

2) भाईंदर पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.5,00,00,000/-

वरील कामासाठी एकूण रु.13,00,75,713/- एवढया रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून शासनाकडून रु.3.00 कोटी खर्चास व निधी उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता आहे. सदर कामाचा उर्वरीत रु.10,00,75,713/- रकमेचा खर्च करण्यासाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध नाही. त्यामुळे उर्वरित रु.10,00,75,713/- निधी उपलब्ध होण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवून निधी उपलब्ध झाल्यास सदर काम हाती घेता येईल. वरील वस्तुस्थीती सादर करण्यात येत आहे.

(डॉ. नरेश गीते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. १८/०९/२०१८ वेळ ०३.१५

मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ६९

लिपिक १९/०९/२०१८

नगरसचिव विभाग.

(१)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## बांधकाम विभाग
## मा. महासभा दि.२४/०२/2018
## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक ( ८१ ) :- महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडयाने देणेबाबत धोरण ठरविणे.

**<u>प्रस्ताव</u>**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता असून त्यामध्ये मैदाने, आर.जी व खुले क्षेत्र, उद्याने, समाजमंदीरे, व्यायामशाळा, इमारती अभ्यासिका, विरंगुळा केंद्र, क्रिकेट पीच, मार्केट मधील गाळे, नव्याने विकसित केलेले कम्युनिटी हॉल, स्मशानूमी, दफनभूमीचा समावेश होतो. सदर मालमत्ता विविध कार्यक्रमांसाठी विविध संस्थाकडून भाडयाने तसेच संचलन व देखभाल दुरुस्तीसाठी मागण्यात येते. तथापी सदर मालमत्ता भाडयाने देणेबाबत ठरविलेले दर हे कमी असून त्यामधून मालमत्तेच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च देखिल निघु शकत नाही, त्याकरीता सर्व दर नव्याने ठरविण्याची आवश्यकता आहे. तसेच सदर मालमत्ता भाडयाने देताना प्रचलित कायदे, शासन निर्णय यांचे काटेकोररीत्या पालन होण्याची आवश्यकता असून महानगरपालिकेमार्फत देखिल मालमत्ता भाडयाने देण्यासाठी पात्रता निकष व अटीशर्ती बाबत धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत भाडे बाबतचा खालीलप्रमाणे तपशिल व प्रस्ताव देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मालमत्ता प्रकार | सध्याचे भाडे प्रति दिन | प्रस्तावित भाडे प्रतिदिन | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | समाजमंदीरे / कम्युनिटी हॉल / इतर वास्तूमधील जागा / शाळेमधील वर्ग | | | |
| | अ) (500 चौ.फुटापर्यंत) | रु.1000/- | रु.3000/- | रु.3000/- |
| | ब) (500 चौ.फुटवर) | रु.5000/- | रु.10,000/- | रु.5000/- |
| 2 | मंगल कार्यालय नगरभवन | | | |
| | अ) (वातानुकुलित) | रु.6500/- | रु.15,000/- | रु.10,000/- |
| | ब) (विना वातानुकुलित) | रु.5000/- | रु.10,000/- | रु.8,000/- |
| | ओपन टेरेस | रु.2000/- | रु.5,000/- | रु.2,000/- |
| | दिवाबत्ती दर | रु.15/- प्रति युनिट | रु.15/- प्रति युनिट | - |
| | खुर्ची भाडे | रु.5/- प्रति नग | रु.10/- प्रति नग | - |
| | पाणी वापर, | रु.500/- | रु.1,000/- | - |
| | साफसफाई खर्च | रु.1000/- | रु.1,000/- | - |
| 3 | मैदाने, आरजी क्षेत्र, खुल्या जागा, उद्याने | | | |
| | अ) शाळेच्या शैक्षणिक कार्यक्रमासाठी | रु.3,000/- | रु.10,000/- | रु.5,000/- |
| | ब) खेळांसाठी / क्रिडास्पर्धा | रु.3,000/- | रु.10,000/- | रु.5,000/- |
| | क) धार्मिक कार्यक्रमासाठी | रु.3,000/- | रु.15,000/- | रु.5,000/- |
| | ड) स्वातंत्र दिन, महाराष्ट्र दिन आणि त्या प्रकारच्या राष्ट्रीय व महत्त्वाच्या प्रसंगी व राष्ट्रीय महापुरुषांच्या जयंतीच्या व पुण्यतिथी समारंभासाठी | रु.3,000/- | रु.5,000/- | रु.5,000/- |
| | इ) मनपा कार्यक्रमासाठी | विनामुल्य | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | **क्रिकेट खेळपट्ट्या** | | | |
| | **<u>सीझन खेळपट्टी</u>** | | | |
| | शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी | रु.100/- प्रति दिन (2 तास) | रु.200/-प्रति दिन (2तास) | - |
| | शहरातील क्लब / संघ | रु.400/- प्रति दिन (2 तास) | रु.800/-प्रति दिन (2तास) | - |
| | शहराबाहेरील क्लब / संघ | रु.800/- प्रति दिन (2 तास) | रु.1200/-प्रति दिन (2तास) | - |
| | **<u>मॅट विकेट</u>** | | | |
| | शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी | रु.250/- दररोज (दोन तास) | रु.700/- दररोज (दोन तास) | - |
| | शहरातील क्लब / संघ | रु.1000/- दररोज (दोन तास) | रु.1500/-दररोज (दोन तास) | - |
| | शहराबाहेरील क्लब / संघ | रु.1500/- दररोज (दोन तास) | रु.2000/- दररोज (दोन तास) | - |
| | **<u>साधी खेळपट्टी</u>** | | | |
| | शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी | रु.150/- दररोज (दोन तास) | रु.300/- दररोज (दोन तास) | - |
| | शहरातील क्लब / संघ | रु.800/- दररोज (दोन तास) | रु.1200/- दररोज (दोन तास) | - |
| | शहराबाहेरील क्लब / संघ | रु.1200/- दररोज (दोन तास) | रु.1500/- दररोज (दोन तास) | - |
| | **<u>टेनिस खेळपट्टी</u>** | | | |
| | शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी | रु.50/- प्रति दिन (2 तास) | रु.100/- प्रति दिन (2तास) | - |
| | शहरातील क्लब / संघ | रु.100/- प्रति दिन (2 तास) | रु.200/-प्रति दिन (2 तास) | - |
| | शहराबाहेरील क्लब / संघ | रु.200/- प्रति दिन (2 तास) | रु.400/- प्रति दिन (2तास) | - |
| 5 | शुटींगसाठी रस्ता मालमत्ता भाडयाने देणे. | | | |
| | रस्ता | रु.25,000/- | रु.30,000/- | रु.25,000/- |
| | उदयान व मैदान (1 एकर क्षेत्रापर्यंत) | रु.50,000/- | रु.60,000/- | रु.25,000/- |
| | (1एकरच्या वरील क्षेत्रासाठी) | रु.1,00,000/- | रु.1,20,000/- | रु.25,000/- |
| 6 | रस्ते, सार्वजनिक जागावर मंडप परवानगी | | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु.1.00/- प्रति चौ.फुट प्रति दिन | रु.5.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन | रु.7.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव) | रु.0.50/- प्रति चौ.फुट प्रति दिन | रु.1.00/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | रु.2.00 प्रति चौ.फुट/ प्रति दिन |
| | क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शैक्षणिक संस्था) | रु.250/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | रु.1000/- प्रति गेट/ प्रति दिन | रु.3,000/- प्रति गेट प्रति दिन |
| | ड) गेट / कमानी / बॅनर (इतर संस्था) | रु.500/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | रु.3000/- प्रति गेट/ प्रति दिन | रु.5,000/- प्रति गेट प्रति दिन |
| 7 | स्ट्रीट लाईट पोलवर एरीयल केबल टाकणेस परवानगी देणे | रु.100/- प्रति पोल<br>रु.30,000/- प्रतिकि.मीटर | रु.200/- प्रति पोल<br>रु.50,000/- प्रतिकि.मीटर | -<br>- |
| 8 | सार्वजनिक जागा, फुटपाथ यावर ठेवण्यात येणारे सामान | - | रु.50 प्रति चौफुट प्रतिदिन | |
| | | | रु.150 चौफुट प्रतिदिन दंड (विनापरवानगी) Retrospective effect ने अंमलबजावणी करणे. | |

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची समाज मंदिरे, व्यायामशाळा, वाचनालय व योगा शेड इ. मालमत्ता तीन ते पाच वर्ष मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठी प्रस्तावित धोरण.**

1) महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्ता सेवाभावी / खाजगी संस्थांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (ग) मधील तरतूदी वगळता सवलतीच्या दरात भाडयाने देण्याची तरतूद नाही. महानगरपालिकेच्या सद्यस्थितीत भाडयाने दयावयाच्या मालमत्ता हया कलम 79 (ग) मध्ये येत नसल्याने सवलतीच्या दराने भाडयाने देता येणार नाही.चालू बाजार भावानूसार ई-लिलाव पध्दतीने मालमत्तेचा विनियोग करण्यात येईल.

2) मालमत्ता 3 वर्ष मुदतीसाठी करारनामा करुन देण्यात येईल.

3) सदर नेमलेल्या संस्थानी फक्त त्यांच्या संस्थेचा फलक महानगरपालिकेकडून मजकूर मंजूर करुन घेऊन लावण्यास यावा. तसेच महानगरपालिकेत नामकरण केलेली नाम फलक सुध्दा बसवुन द्यावा लागेल. त्याचे मोजमाप सर्व मनपा हद्दीमध्ये समान राहील.

4) मालमत्तेची दैनंदिन साफसफाई व सुरक्षा व्यवस्था संस्थेस करावी लागेल, महानगरपालिकेमार्फत कर्मचारी नेमण्यात येणार नाहीत.

5) सदर मालमत्तेची देखभाल दुरुस्ती, रंगरंगोटी कामे महानगरपालिकेच्या सुचनेप्रमाणे वेळोवेळी करावी लागतील.

6) सदर ठिकाणी वीज जोडणी व पाणी जोडणी महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल, तथापी त्याची मासिक देयक संस्थेस भरावे लागेत.

7) मंजूर नकाशा व्यतिरिक्त अतिरिक्त कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

8) परस्पर इतर कोणत्याही संस्थेस अथवा इसमास सदर मालमत्ता देता येणार नाही.

9) सदर मालमत्ता दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्ती कशाप्रकारे करणार या बाबत कर्मचाऱ्याची पदे संस्था, वेतन या सह माहिती दयावी लागेल. त्या कर्मचाऱ्यांचे कोणतेही दायीत्व मनपाचे राहणार नाही.

10) नेमलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानूसार वेतन देणे बंधनकारक राहील.

11) सदर जागेच्या ठिकाणी काही अपघात घडल्यास अथवा हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.

12) मालमत्तेच्या जागेबाबत वाद निर्माण झाल्यास करारनामा रद्द करण्यात येईल.

13) दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीचे काम समाधानकारक न आढळल्यास 7 दिवसाची नोटीस देऊन करारनामा रद्द करण्यात येईल.

14) सदर संस्थांनी मागील तीन वर्षाच्या Audited Balance Sheet जोडणे बंधनकारक राहील.

15) संबंधित संस्थानी मालमत्ता कशाप्रकारे देखभाल दुरुस्ती करणार तसेच महानगरपालिकेस त्या व्यतिरिक्त काय मदत करणार याचा उल्लेख करणे आवश्यक राहील.

16) प्राप्त अर्जातुन मागणीनुसार कोणत्याही एका संस्थेस एक अथवा एकापेक्षा जास्त मालमत्ता देखभाल, संचलन, दुरुस्तीसाठी देण्याबाबतचा अंतिम निर्णय आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.

17) सदर संस्था महानगरपालिकेची कोणेत्याही देयकाची ठकबाकीदार नसावी.

18) यशस्वी संस्थेकडून भाड्याच्या कालावधी करीता सुरक्षा अनामत रककम ठरवून घेण्यात यावी.

19) सदर मालमत्ता सेवाभावी व धर्मदाय आयुक्तांकडील नोंदणीकृत संस्थेस भाड्याने देण्यात यावी.

**महानगरपालिकेच्या मालमत्ता अल्प मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठी प्रस्तावित धोरण.**

1) श्रीगणेशोत्सव/ नवरात्रोत्सवासाठी मैदाने भाड्याने देण्यासाठी मा. महासभेने ठरविलेले भाडे पहील्या दिवसासाठी आकारण्यात येईल. तद्नंतर च्या दिवसासाठी रु.1000/- प्रति दिन भाडे आकारण्यात येईल.

2) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अ नुसार मैदाने व इतर जागा भाड्याने देण्याची दक्षता घेण्यात येईल. इतर वेळेस मैदाने व इतर जागा सर्वसाधारण नागरीकाच्या वापरासाठी खुली राहील.

3) मैदाने / उद्याने व कोणत्याही मालमत्ता महापालिकेच्या कार्यक्रमाकरिता विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येतील. महानगरपालिकेच्या मालमत्ता कोणत्याही राजकीय पक्षांच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत त्यासाठी उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास मा. आयुक्त महोदय यांची मंजुरी घेणे आवश्यक राहील.

4) मैदाने, सभागृह व मालमत्ता प्रामुख्याने शैक्षणिक, सामाजिक व वैज्ञानिक उपक्रमांना प्राधान्याने देण्यात येतील.

5) सभागृहात भोजन व खानपान व्यवस्था करता येणार नाही.

6) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने भाडयाने देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांनी अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्यांचे राहतील.

7) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने याबाबत आरक्षणाचे बाबंतीत काही वाद निर्माण झाल्यास त्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहतील.

8) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने यांची देखभाल निगा व दुरुस्ती कार्यकारी अभियंता तथा मिळकत व्यवस्थापक यांचे अधिपत्याखाली राहतील.

9) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने भाडयाने देतांना भाडयांत सवलत देण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहतील.

10) मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास तयाची जबाबदारी संबंधित व्यक्ती/ संस्थेवर राहील व संबंधितांचे (डिपॉझीट) अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल व दंड आकारुन नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल.

11) कार्यक्रम रद्द झाल्यास सदरच्या कार्यक्रमासाठी भरलेले भाडे संबंधितांना परत मिळणार नाही. परत द्यावयाचे झाल्यास मा.आयुक्त महोदय यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

12) महापालिकेस मालमत्तेच्या जागा, सभागृहे / मैदाने यांची आवश्यकता असल्यास संबंधितांचे आरक्षण रद्द करणेत येईल व सदरचे संस्थेस / व्यक्तीस जागा खाली करुन पालिकेच्या ताब्यात द्यावे लागेल व संबंधितांस सदरबाबतीत कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

13) कोणत्याही मालमत्तेबाबत वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त महोदय यांचे आदेश अंतिम राहतील व सदरचा आदेश संबंधितांवर बंधनकारक राहील.

14) शासनाकडून वेळोवेळी येणाऱ्या सुचना/ आदेश यांचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहतील.

15) ज्या संस्थेस / व्यक्तीस महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडयाने देण्यात आले असेल त्या संस्थेस / व्यक्तीस कोणत्याही कारणास्तव सदरहू मालमत्ता इतर संस्थेस / व्यक्तीस वापरास परस्पर देता येणार नाही.

16) मालमत्ता भाड्याने आरक्षण ज्या दिवसापासून पाहिजे आहे तो दिवस वगळुन अगोदर 60 दिवस मैदान / सभागृह आरक्षीत करता येईल. त्या आधी आलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

17) मालमत्ता वापरासाठी उपयोग अनुज्ञेय करतांना त्या अनुषंगाने येणारे नियम आदेश नियमावली न्यायालयांचे आदेश व मुंबई पोलिस अधिनियमाखाली जारी केलेल्या आदेशाचे पालन काटेकोरपणे करावे लागेल.(महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना (सुधारणा) अध्यादेश 1997 या महाराष्ट्र अध्यादेश क्र.14 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.37 (अ) नुसार.

18) महापालिकेने मालमत्ता भाडयाने देणेबाबत वेळोवेळी दिलेले आदेश संबंधितांवर बंधनकारक राहतील.

19) महानगरपालिका मालमत्तेमध्ये कोणत्याही कार्यक्रम करण्यापुर्वी त्या त्या कार्यक्रमाच्या स्वरुपाच्या अनुषंगाने केंद्र/राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम व आदेशाची पुर्तता व अनुपालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहील. याबाबत कोणत्याही प्रकारे नियमभंग झाल्यास त्याची जबाबदारी संपुर्णपणे संबंधित व्यक्ती / संस्थेची राहील.

20) सदर मालमत्ता नोंदणीकृत सेवाभावी संस्था, कोणत्याही नोंदणीकृत संस्था, कंपनी, भागीदारी संस्था यांना देण्यात येतील.

21) सदर मालमत्ता साठ दिवसाच्या आत आरक्षित करणे आवश्यक राहील.

**<u>मार्केट / मंडईतील गाळे भाड्याने देण्याबाबत प्रस्तावित धोरण :</u>**

1) भाजी मंडईतील गाळयाचे भाडे प्रतिमाह, प्रति चौरस फुट रु.4 /-प्रमाणे राहील. प्रतिवर्षी सदर भाडयात 10% वाढ करणेत येईल, अथवा महापालिका वेळोवेळी त्या बाबत निर्णय घेईल.

2) भाजी मंडईतील गाळा 11 वर्षाच्या भाडेपट्टा कराराने देणेत येईल. पुढील मुदतवाढ देणेचे अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहे.

3) ओटा फक्त भाजी व्यवसायासाठी आहे. इतर कोणतेही व्यवसाय ओटयात करता येणार नाही. सदर ओटात अर्जदार व त्यांचे कुंटुबीय यांनाच फक्त व्यवसाय करता येईल.

4) सदरचा ओटा महापालिकेच्या परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही. वारसाच्या नावे ओटा हस्तांतरीत करण्यास महापालिकेच्या परवानगी घ्यावी लागेल.

5) मंडईची वेळ सकाळी 7.00 ते रात्री 8.30 वाजेपर्यंत राहील.

6) विक्रीचा माल फक्त देणेत आलेल्या गाळयामध्ये व ठेवणेचा असून अन्य मोकळी जागा त्यासाठी वापरणेची नाही.

7) सदर ओटयाची दुरुस्ती व निगा हे मंजुर ओटेधारकांने स्वखर्चाने करावयाचे आहे. मात्र सदर ओटयात कोणत्याही प्रकाराचा फेरबदल करावयाचा नाही. दुरुस्तीसाठी महापालिकेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

8) सदर ओटयात स्पोटक किंवा ज्वालाग्राही सामान ठेवता येणार नाही.

9) विक्रीस ठेवलेल्या मालाचा निरुपयोगी भाग अगर कोणत्याही प्रकारची घाण मंडईमध्ये ठरविलेल्या जागीच टाकली पाहिजे इतरत्र कोठेही ठेवता येणार नाही.

10) सदर ओटयाचा विक्रेता किंवा नोकर हा संसर्गजन्य रोगापासून मुक्त असला पाहिजे.

11) वेळोवेळी ओटेधारकांची अगर त्याचे सेवकांची शारिरीक तपासणी व विक्री करिता ठेवलेल्या मालाची तपासणी महापालिकेचे आरोग्य अधिकारी अगर महापालिकेने पाठविलेल्या अन्य अधिकारी यांना करण्याचा अधिकार राहील.

12) उपयोगात आणणेची मापे व काटे सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेतली असली पाहिजे.

13) सदर ओटेधारकाने वैयक्तिक रित्या किंवा सामुदायीक रित्या विज मिटर स्वतंत्र घ्यावा व विजेचे मिटर घेणेसाठी "ना हरकत दाखला" महानगरपालिकेकडून घ्यावा.

14) कोणत्याही ओटेधारकाला गिऱ्हाईकांच्या आकर्षणाकरीता कर्ण/ कर्कश ध्वनीचा व त्यासंबंधी साहित्याचा उपयोग करता येणार नाही.

15) सदर ओटयाची आपणास दिलेली मुदत संपताच ओटयाची मालकी महापालिकेची असेल. त्याबद्दल कोणताही हक्क व नुकसान भरपाई मागता येणार नाही.

16) ओटेधारकांने ओटयाचे भाडे दर महिन्याच्या 10 तारखेच्या आत महापालिकेकडे आगाऊ भरले पाहिजे. दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधी थकीत राहिल्यास महापालिका कोणतीही पुर्व सुचना न देता महापालिका ओटा ताब्यात घेईल.

17) अर्जदार संस्थेने जागेची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन प्रत्येकी जागेसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा. सदर जागा "जशी आहे तशी "As in where is" देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

18) अर्जदार संस्था मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रात अर्ज सादर केल्यापासून मागील 3 वर्षे सामाजिक कार्यात कार्यरत असावी.

19) अर्जदार संस्थेस सलग 3 वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल (Audit Report) (ताळेबंद अहवाल) सादर करावे लागतील. महानगरपालिकेने निश्चित केलेले मासिक भाडे हे पायाभुत भाडेदर (Base rate) ठेऊन स्पर्धात्मक भाडेदर मागविण्यात येत आहेत. त्यामध्ये, जास्तीत जास्त भाडे देकार देणाऱ्या व्यक्ती / संस्थेस जागा भाडे कराराने देण्यात येईल.

20) सदर मिळकतीमध्ये कार्यरत असलेली व्यक्ती / संस्था स्पर्धात्मक दराने प्राप्त झालेल्या दराएवढे भाडेदर देण्यास तयार असल्यास (संस्थेने दरपत्रक उघडतेवेळी तसे लेखी दिल्यास) अशावेळी संस्थेची निवड करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील.

अ) ज्या अर्जदार संस्था मासिक भाडे भरण्याचा पर्याय स्विकारतील अशा अर्जदार/ व्यक्ती/ संस्थांनी 11 महिन्याचे मासिक भाडे (डिमांड ड्राफ्ट /post dated cheque) व्दारे महानगरपालिकेस अदा करावे लागेल व सोबत अर्जदार संस्थेचे अर्जदार संस्थेचे ज्या बँकेत खाते असेल, (सध्या व्यवहार होत असलेले) त्या बँकेतील खाते क्रमांक व पासबुकातील पहिल्या पानाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

ब) GST COUNCIL यांचे दिनांक 19/05/2017 रोजीच्या मंजुरीनुसार GST Reverse Charges VIDE SR.NO.6 (1) अन्वये महानगरपालिकेच्या भाडे वसूली संदर्भात Renting of immovable Property वर दिनांक 01 जुलै 2017 पासून 18% GST (GOODS & SERVICE TAX) लागु झाला आहे. संबंधीत अर्जदार /व्यक्ती /संस्थांना भाडयाच्या रक्कमेवर नियमानुसार अधिक वस्तु सेवा शुल्क (GST) व अन्य कर भरणा करणे बंधनकारक राहील.

क) अर्जदार संस्थेने ज्या दिवसापासून जागा वापरण्याकरीता घेतली आहे त्या दिवसापासूनचे भाडे भरणा करणे, अर्जदार संस्थेस दोन महिन्यापेक्षा जास्त भाडे थकीत केल्यास मासिक भाडयानुसार दरमहा 1% प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

ड) अर्जदान संस्थेच्या त्या वर्षातील कामाचा आढावा घेऊन पुढील वर्षाकरीता मुदतवाढ देणे अथवा भाडेकरार रद्द करणे बाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त यांचा असेल.

21) संबंधीत संस्थांना विज देयक व पाणी देयक स्वतंत्रपणे अदा करावे लागेल व त्याची छायांकित प्रत वेळोवेळी महानगरपालिकेस उपलब्ध करुन द्यावी लागेल. सदरची देयके थकीत झाल्यास त्याच्या सुरक्षा अनामत रक्कमेतुन देयके भरणा करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

22) महापालिका मिळकतीमध्ये विदयुत व पाणी व्यवस्था नसल्यास अर्जदार संस्थेला ती स्वत: करावी लागेल व त्याकरीता आवश्यक नाहरकत दाखला महापालिकेकडून देण्यात येईल.

23) सदयस्थितीत सदर जागा आधार नोंदणी. निवडणुक मतदार नोंदणी अथवा इतर मनपाच्या/ शासकीय कामाकारीता वापरात असेल किंवा पुर्नविकासाच्या प्रक्रियेत असेल तर सदरचे शासकीय काम पुर्नविकास पुर्ण झालेनंतर पात्र संस्थेला जागेचा ताबा देण्यात येईल व ताबा दिनांकापासून करारनामा व भाडे अस्तित्वात येईल.

24) जागा भाडयाने उपलबध करुन देणेकरीता प्राप्त देकार स्विकारणे अथवा नाकारणे किंवा एखादया संस्थेने एकापेक्षा जास्त जागांसाठी अर्ज केल्यास अशा संस्थेस किती जागा द्यावी याबाबतचे अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखून ठेवलेले आहेत.

<u>स्मशानभूमी/ दफनभूमी, विरंगुळा केंद्र, क्रिकेट पिच</u>

1) स्मशानभूमी, दफनभूमी संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल.

2) विरंगुळा केंद्र संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना मा. महासभा दि.20/03/2013 ठराव क्र. 67 अन्वये निश्चित केलेल्या धोरणानूसार निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल.

3) क्रिकेट पीच दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रीया करुन संस्थेची निवड करण्यात येईल.

दिर्घ मुदतीसाठी मालमत्ता भाड्याने देताना दर वर्षी 5 ते 10 टक्के भाडे वाढविण्यात येईल. तसेच मुदतीत भाडे न भरल्यास 18 टक्के व्याज आकारण्यात येईल. प्रस्तावित धोरण अंमलात येण्यापूर्वी ज्या मालमत्ता भाड्याने देण्यात आलेल्या आहेत व त्याची मुदत संपणे बाकी आहे त्याबाबतीत सदर धोरण लागू राहणार नाही.

**शहरातील महानगरपालिकेच्या जागा, रस्ते, गटाराचा स्लॅब, पदपथावर व्यापारी/ दुकानदार/ गॅरेजवाले/ इतर हे विविध ठिकाणच्या जागा अनेक दिवसापासून वापरत आहेत. त्यांची व्यापारी तत्वासाठी जागेचा उपयोग केला असल्याने पूर्वलक्षी प्रभावाने त्यांचे कडून अनधिकृत वापरासाठी जागा भाडे वसूल करण्यात येईल.**

**शुटींगसाठी परवानगी न घेता शुटींग सुरू केलेले असेल तर हे भाडे दुप्पट वसूल करण्यात येईल. शुटींगसाठी अर्ज केला आणि परवानगीसाठी प्रभाग अधिकारीकडे प्रलंबित असले तरीही दुप्पट भाडे वसूली करण्यात येईल. यासाठी विषेश तरतुद करण्यात येत आहे.**

वरील प्रमाणे प्रस्तावित भाडे निश्चित करण्यास व धोरण अंतिम करण्यास शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

~~प्राप्त दि. ०८/०९/२०१८~~

८/९/२०१८

गोषवारा प्राप्त दि. १०/०९/२०१८ वेळ ०१:०० वा.

~~मा. स्थायी समिती~~ / [illegible] गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ६९

दिनांक १०/०९/२०१८

नगर[illegible]व विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२६/०२/२०१८

## मिळकत विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक. ( ८२ )** :- भाईंदर (पुर्व) इंद्रलोक येथील स्व. प्रमोद महाजनजी इमारतीमधील सभागृह (आरक्षण क्र.218) भाडे दर व धोरण ठरविणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) इंद्रलोक भागात आरक्षण क्र. 218 कम्युनिटी हॉलसाठी आरक्षित असून सदर जागेत तळ अधिक दोन मजल्याची इमारत बांधण्यात आली आहे. सदर इमारतीमध्ये पहीला व दुसऱ्या मजल्यावर वातानुकुलित सभागृह बांधण्यात आलेले आहेत. सदर इमारतीचा वापर सुरु करावयाचा आहे. सदर सभागृहाचे खालीलप्रमाणे भाडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

वातानुकुलित सभागृह रु.50,000/- प्रतिदिन रु.20,000/- अनामत रक्कम.

सदर इमारतीचे दैनदिन संचलन, दुरुस्ती, सुरक्षा रक्षक, कर्मचारी, वीजबील, पाणी बील यावर मोठया प्रमाणावर खर्च येणार असून महानगरपालिकेमार्फत कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देखभाल व संचलन करणे शक्य होणार नाही. त्यामुळे सदर इमारतीमधील सभागृह दैनदिन संचलन, देखभाल, दुरुस्तीसाठी खाजगी संस्थेला निविदा प्रक्रीयेद्वारे दिल्यास सदर संस्थेमार्फत महानगरपालिकेने ठरविलेले भाडे व अटीशर्तीनुसार सभागृह भाडयाने देऊन इमारतीची देखभाल, दुरुस्ती, वीजबील, पाणीबील चा खर्च स्वत: करुन कर्मचारी वर्ग देखिल संस्थेमार्फत स्वखर्चाने उपलब्ध करण्यात येतील तसेच महानगरपालिकेस उत्पन्न देखिल मिळू शकेल. वरील प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होण्यास शिफारस आहे.

(डॉ. नरेश गीते)

**आयुक्त**

मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-2/DK/2017-18/MG-4

गोषवारा प्राप्त दि. ०८/०९/२०१८ वेळ ०५:३० वा

मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ६५

लिपीक ०८/०९/२०

नगरसचिव विभाग.

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ९३ ) :- मिरारोड (पुर्व) रामदेव पार्क येथील मिनाताई बाळासाहेब ठाकरे मार्केट (आरक्षण क्र. 231) भाडे दर व धोरण ठरविणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) रामदेव पार्क भागात आरक्षण क्र. 231 मार्केटसाठी आरक्षित असून सदर जागेत तळमजल्यावर मार्केट व पहिला व दुसरा मजल्यावर सभागृह बांधण्यात आलेले आहेत. त्यापैकी दुसऱ्या तळमजल्यावरील सभागृह वातानुकूलीत आहे.

सदर इमारत पुर्णत्वास असून इमारतीचा वापर सुरू करावयाचा आहे. सदर सभागृहाचे खालीलप्रमाणे भाडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| वातानुकूलीत सभागृह (दुसरा मजला) | रू.50,000/- प्रति दिन | रू.20,000/- अनामत रक्कम |
| विना वातानुकूलीत सभागृह (पहिला मजला) | रू.40,000/- प्रति दिन | रू.15,000/- अनामत रक्कम |

मिनाताई बाळासाहेब ठाकरे इमारतीचे दैनंदिन संचलन, देखभाल दुरूस्ती, सुरक्षा रक्षक, वीज बील, पाणी बील तसेच कर्मचारी वर्गावर मोठ्या प्रमाणावर खर्च येणार असून महानगरपालिकेस कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देखभाल व संचलन करणे शक्य होणार नाही. त्यामुळे सदर इमारतीमधील मार्केट व दोन्ही सभागृह दैनंदिन संचलन, देखभाल दुरूस्तीसाठी खाजगी संस्थेला निविदा प्रक्रियेव्दारे दिल्यास सदर संस्थेमार्फत महानगरपालिकेने ठरविलेले भाडे व अटीशर्तीनुसार सभागृह भाड्याने देऊन इमारतीची देखभाल, दुरूस्ती, वीज बील, पाणी बील चा खर्च करून कर्मचारी वर्ग देखील संस्थेमार्फत स्वखर्चाने उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच महानगरपालिकेस उत्पन्न देखील मिळेल. वरील प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होण्यास शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC-6/DK/2017-18/ MG-4

नोंद रजिस्टर अ. क्र........६८..............

दिनांक 04/09/२०१८

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.२६/०२/२०१८

पे ॲन्ड पार्क विभाग

//गोषवारा//

**प्रकरण क्र.८४: मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲण्ड पार्क (वाहनतळ) दर वाढीबाबत.**

मिरा भाईंदर महापालिकेच्या आर्थिक हिताचा विचार करुन शहरातील पार्किंकचे दर वाढविण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार मा. महासभा ठराव क्र. 34 दि. 8/12/2017 रोजी ठराव पारित केला आहे. अस्तित्वात असलेल्या निविदा धारकांचा कालावधी अनुक्रमे माहे मे 2018, माहे जुन 2019 व माहे जूलै 2019 दरम्यान संपत आहे. सदर ठरावात नमुद केल्याप्रमाणे निविदा रद्द केल्यास त्याविरुद्ध ठेकेदार मा. न्यायालयात दाद मागुन महानगरपालिके विरुद्ध प्रतिबंधात्मक आदेश प्राप्त करुन घेण्याची शक्यता आहे त्यामुळे महानगरपालिकेस आर्थिक नुकसान होऊ शकते.

तथापी पुर्वी देण्यात आलेल्या निविदाधारकांशी केलेल्या करारनाम्याचे अवलोकन केले असता अट क्र. 4 नुसार भविष्यात पे ॲण्ड पार्कच्या मंजुर दरात वाढ झाल्यास वाढीव महसुल रक्कमेनुसार निविदाधारकांस महसुल अदा करावा लागेल असे नमुद केलेले आहे. त्यामुळे मा. महासभा ठराव क्र. 34 अन्वये मंजुर केलेले दर संबंधित निविदाधारकांना लागु करता येऊ शकतील.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि “ड” मधील प्रकरण 2 महापालिका कामकाजाचे नियम “र” अन्वये मा. महासभेने पारित केलेला ठराव फेरबदल करण्यास व त्याप्रमाणे सध्याच्या निविदाधारकांना त्यांचा कालावधी संपुष्टात येई पर्यंत त्यांचा ठेका नविन दराने चालू ठेवण्यासाठी मा. महासभेस शिफारस असे.

(डॉ. नरेश गिते)

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि०९/०२/२०१८ वेळ ०५.३० वा

मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ७८

(सही) ०९/०२/२०१८

नगरसचिव विभाग.

# बांधकाम विभाग

## मा. महासभा दि.26/02/2018

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (95)** :- भाईंदर (पूर्व) आराधना इमारत ते आराधना इंडस्ट्रीपर्यंत व चंद्रलोक इमारतीपासुन खाडीपर्यंत (आराधना नाल्याची) पुर्न:बांधणी करीता प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

भाईंदर (पुर्व) भाजी मार्केट ते आराधना इंडस्ट्री ते बंदरवाडी स्मशानभुमी ते चंद्रलोक इमारत ते आर.एन.पी. पार्क ते खाडीपर्यंत आराधना नाला वाहत आहे. सदर नाल्यामधुन भाजीमार्केट, जय अंबे इंडस्ट्री व नवघर परिसर, एस.व्ही. रोड परिसरामधील सांडपाण्याचा निचरा होत आहे.

सदर नाल्याचे आराधना इंडस्ट्रीपासुन चंद्रलोक इमारतीपर्यंत नाल्याची पूर्न:बांधणी केलेली आहे. सदर नाल्याची पुर्न:बांधणी करण्याची मागणी संदर्भिय पत्रान्वये करण्यात आलेली आहे. संपुर्ण नाल्याची पहाणी करुन पूर्न:बांधणी करण्याची आवश्यक असलेल्या नाल्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्याकामी रु.3,81,42,250/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर कामासाठी प्रत्यक्षात खर्च हा सन 2018-19 च्या आर्थिक वर्षातील "नविन गटारे / नाले बांधकाम" या लेखाशिर्षाखाली तरतुद करुन तद्नंतर कामाबाबतची पुढील प्रक्रिया करावी लागेल. सदर वस्तुस्थिती सादर करण्यात येत आहे.

(बी. जी. पवार)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2017-18/MG -14

गोषवारा प्राप्त दि. 20/2/२०१८ वेळ १२.४०
मा. स्थायी ~~समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 68

लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.26/02/2018

## मिळकत विभाग

## // गोषवारा //

<u>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण दोन (1)(के) अन्वये प्रस्ताव</u>

**प्रकरण क्रमांक. (        )** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गॅरेजेस, कार वॉशिंग सेंटर, सर्व्हीस सेंटर, वाहन शोरूम, स्पेअर पार्ट्स विक्रेते यांना परवाना देणे, दंडात्मक कारवाई करणेबाबतच्या धोरणास मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गॅरेजेस, कार वॉशिंग सेंटर, सर्व्हीस सेंटर, वाहन शोरूम, स्पेअर पार्ट्स विक्रेते यांना परवाना देणे, दंडात्मक कारवाईबाबत धोरण ठरविणेसाठी मा.महासभा दि.08/12/2017 ठराव क्र.45 अन्वये समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीची दि.21/02/2018 रोजी बैठक होऊन त्यामध्ये खालील धोरण ठरविण्यात आले असून त्याचे इतिवृतांत मा.महापौर यांनी पाठविलेले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गॅरेजेस, कार वॉशिंग सेंटर, सर्व्हीस सेंटर, वाहन शोरूम, स्पेअर पार्ट्स विक्रेते यांना परवाना देणे, दंडात्मक कारवाई करणेसाठी धोरण ठरविणेस मा. महासभा दि.08/12/2017 ठराव क्र. 45 अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार तदर्थ समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीची बैठक दि.21/02/2018 रोजी सकाळी 11.00 वा. मा महापौर यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस समितीचे खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| श्रीम. डिम्पल मेहता | मा. महापौर तथा अध्यक्ष |
| श्री. चंद्रकांत वैती | उपमहापौर तथा सदस्य |
| श्री. ध्रुवकिशोर पाटील | सभापती, स्थायी समिती तथा सदस्य |
| श्री. रोहीदास पाटील | सभागृह नेता तथा सदस्य |
| श्री. राजू भोईर | विरोधी पक्ष नेता तथा सदस्य |
| श्री. हसमुख गेहलोत | गटनेता, भाजपा तथा सदस्य |
| श्री. हरिश्चंद्र आमगावकर | गटनेता, शिवसेना तथा सदस्य |
| श्री. जुबैर इनामदार | गटनेता, राष्ट्रीय कॉग्रेस तथा सदस्य |
| श्री. शिवाजी बारकुंड | शहर अभियंता |
| श्री. दिपक पूजारी | उप आयुक्त |
| श्री. दिपक खांबित | कार्यकारी अभियंता (मिळकत) |
| श्रीम. स्वाती देशपांडे | सहा आयुक्त |
| श्रीम. सई वडके | विधी अधिकारी |

उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली. उपस्थित सदस्यांकडुन सदर धोरण ठरविण्याच्या अनुशंगाने साधक बाधक चर्चा करण्यात आली.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत खालीलप्रमाणे गॅरेजेस आहेत.

| | |
|---|---|
| दुचाकी वाहन | 58 |
| तीन चाकी वाहन | 17 |
| चार चाकी वाहन | 68 |
| **एकूण** | **143** |

सदर कामाचा व्यवसाय करणाऱ्याकडून महानगरपालिकेचे पदपथ, रस्ते, सार्वजनिक जागावर वाहने उभी करुन व्यवसाय करण्यात येत असल्याने वाहतूकीस व रहदारीस अडथळा निर्माण होत असतो. तसेच त्यांच्या व्यवसायामुळे सदर परिसरात कचरा, घाण निर्माण होऊन परिसर गलिच्छ होत असतो. शहरातील सार्वजनिक रस्ते, पदपथ, सार्वजनिक व मोकळया जागा वाहतुकीस, रहदारीस मोकळया राहणे आवश्यक असून सदर परिसर स्वच्छ राहण्याच्या दृष्टीने सद्यस्थितीत असलेले व नव्याने व्यवसाय सुरु करण्यासाठी गॅरेजेस, कार वॉशिंग सेंटर, सर्व्हीस सेंटर, वाहन शोरुम, स्पेअरपार्ट्स विक्रेते यांच्या व्यवसायाबाबत खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

1) सदर व्यवसाय करण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रभाग अधिकाऱ्याकडून विहीत नमुन्यात परवाना घेणे बंधनकारक राहील.

2) परवान्यासाठी ज्या जागेवर / जागेत सदरचा व्यवसाय करण्यात येणार आहे / येत आहे त्या जागेचे मालकी / भाडेकरार इ. बाबतचे कागदपत्र व सत्यप्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

3) सदर सत्यप्रतिज्ञापत्रात व्यवसाय करण्यासाठी जागा भाडयाने घेणाऱ्यास अथवा स्वत: व्यवसाय करीत असल्यास त्यांच्याकडून महानगरपालिकेने निश्चित केलेल्या या दंडाची कार्यवाही, मालमत्ता करातून होणारी दंडाची / परवाना फी ची वसूली याबाबत मान्य असल्याबाबत सत्यप्रतिज्ञापत्र लिहून घेणेत यावे.

4) सदर व्यवसाय करणाऱ्यांनी महानगरपालिकेचे गटार, फुटपाथ व रस्ता किंवा खुली जागेत वाहने उभी करू नयेत.

5) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षणाच्या जागेत वरील व्यवसायाकरीता कोणतीही परवानगी देऊ नये, तसेच सद्यस्थितीत आरक्षणाच्या जागेवर सदर व्यवसाय सुरु असल्यास तातडीने बंद करण्यात यावेत व सदर जागेतील बांधकामे काढण्याची प्रक्रीया सुरु करावी.

6) सदर व्यवसाय करणाऱ्यांनी परवाना घेण्यासाठी रु.10,000/- वार्षिक फी राहील.

7) परवाना न घेता वरीलप्रमाणे व्यवसाय केल्यास त्यांच्या विरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच सदरचा व्यवसाय बंद करणेची कार्यवाही करणेत यावी. परवाना पत्राच्या मागे दंड व नियमाबाबत चा मजकूर छपाई करण्यात यावा.

8) आरक्षणा व्यतिरिक्त खाजगी जागेत व्यवसाय करण्यासाठी शेड, रॅम्प व सामानाची खोली यांचे बांधकाम करण्यासाठी संबधित प्रभाग अधिकारी यांनी तात्पुरत्या स्वरुपात परवानगी दयावी.

9) खाजगी जागेत कमीत कमी 300 चौ.फुट जागेत जास्तीत जास्त 3000 चौ.फुट जागेत शेड, रॅम्प व सामानाची खोलीची परवानगी दयावी. सदर शेडमध्ये वॉशिंग रॅम्प, सामान ठेवण्याचा खोलीचा समावेश राहील. सामानाची खोली, कार्यालय यांचे क्षेत्र जास्तीत जास्त 300 चौ.फुट राहील. इतर जागा ही मोकळी राहील.

10) सदर गॅरेजेस बांधकामासाठी तात्पुरत्या स्वरुपात बांधाकाम परवानगी तसेच परवाना देण्यासाठी मा. आयुक्त यांनी प्रभाग अधिकारी यांना अधिकार प्रदान करण्याची प्रक्रीया करावी.

11) सदर बांधकाम परवानगी ही 6 महीन्यासाठी व नूतनीकरणासह जास्तीत जास्त तीन वर्षासाठी देण्यात यावी.

12) सदर जागेचा वापर गॅरेज, शोरुम, वॉशिंग सेंटर, सर्व्हीस सेंटर च्या व्यतिरीक्त इतर कामासाठी करता येणार नाही.

13) सदर व्यवसायाकरीता लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था स्वत: करावयाची असून महानगरपालिकेमार्फत जोडणी दिली जाणार नाही.

14) सदर व्यवसाय करताना महानगरपालिकेचे रस्ते, पदपथ व इतर मोकळया जागेत वाहने दुरूस्ती करीत असल्याचे आढळल्यास परवाना धारक यांच्याकडून खालीलप्रमाणे दंडाची आकारणी करण्यात यावी.

| अ.क्र. | वाहन प्रकार | प्रथम वेळेस दंड | दुसऱ्या वेळेस दंड | तिसऱ्या वेळेस |
|---|---|---|---|---|
| 1 | दुचाकी वाहने | रु.1000/- | रु.2000/- | सापडल्यास परवाना रद्द करुन पुढील कारवाई करण्यात येईल. |
| 2 | तिनचाकी वाहने | रु.15000/- | रु.3000/- | |
| 3 | चारचाकी हलकी वाहने | रु.2000/- | रु.4000/- | |
| 4 | चारचाकी जड वाहने | रु.3000/- | रु.6000/- | |

तसेच परवाना धारकास / गॅरेज मालकास 24 तासात वाहन हटवून जागा रिकामी करुन दयावी लागेल, अन्यथा सदर वाहन टोईंग करुन जप्त करण्यात येईल व टोईंगचा खर्च तसेच दंडाची रक्कम संबधिताकडून वसूल करण्यात येईल. सदर वाहने आरक्षण क्र. 219 या जागेत ठेवण्यात यावीत.

15) दंडाची आकारणी केल्यावर 7 दिवसात दंड न भरल्यास, दंडाची रक्कम भरेपर्यंत 18% च्या दराने व्याज आकारण्यात यावा.

16) तीन महीन्याच्या आत दंडाची रक्कम व व्याजाची रक्कम न भरल्यास सदर रक्कमेची वसूली मालमत्ता कराच्या देयकात समाविष्ट करुन करण्यात यावी व परवाना रद्द करण्यात यावा.

17) वरील धोरणाच्या अंमलबजावणीची माहीती वाहतूक नियंत्रण विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग यांना देऊन त्यांचे सहकार्य घेण्यात यावे, तसेच सदर धोरणास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

18) वरील धोरणा नुसार परवान्याचा अर्ज व परवाना नमूना तयार करण्यात यावा व परवाना देण्यापूर्वी संबंधित अर्जदार, जागामालक याच्याकडून महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार अटीशर्ती मान्य असल्याबाबत सत्यप्रतिज्ञापत्र लिहून घेण्यात यावे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 31 नुसार वरीलप्रमाणे मा.महासभा दि.21/02/2018 ठराव क्र.45 अन्वये गठीत तर्दथ समितीने ठरविलेले व वरीलप्रमाणे सादर केलेल्या धोरणास अंतीम मान्यता देणेस शिफारस आहे.

(बी.जी. पवार)
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-7/DK/2017-18/MG-1